रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I वर्ष ८८ I अंक ११४ I पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
www.krushival.in

# कृषीवल

रायगड, रविवार, दि. २२ सप्टेंबर २०२४
किंमत ४ ₹




# सायबर गुन्हेगारी रोखण्यासाठी बँकेचा पुढाकार

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**वाढत्या सायबर गुन्हेगारीमुळे अनेकांची आर्थिक लूट होत आहे. ही रोखण्यासाठी बँक ऑफ इंडियाने पुढाकार घेतला आहे. ग्राहकांमध्ये आर्थिक साक्षरता निर्माण व्हावी यासाठी सतर्कता जागृत अभियानांतर्गत ग्रामसभेच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली आहे. जिल्ह्यातील ४० हून अधिक ठिकाणी ग्रामसभा तसेच बँकेच्या कार्यालयात बैठक घेऊन मार्गदर्शन करण्यात आले. बँकेच्या स्तुत्य उपक्रमाला ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.**



कॅशलेस आर्थिक व्यवहारावर अधिक भर दिला जात आहे. ८० टक्क्यांहून अधिक ग्राहक कॅशलेस व्यवहार करतात. त्यामुळे रोखीत व्यवहार कमी होऊ लागले आहेत. परंतु ऑनलाईनच्या आर्थिक व्यवहारामध्ये अनेकांची आर्थिक फसवणूक होण्याची भीतीदेखील प्रचंड होऊ लागला आहे. बँकेतून बोलतो असे सांगून आर्थिक लूट करण्याच्या घटना वाढू लागल्या आहेत. कमी व्याजदरामध्ये कर्ज देणे, एटीएम ब्लॉक झाले आहे. पैसे भरावे लागणार असे सांगून अनेकांची फसवणूक करून त्यांच्या बँक खात्यातील रक्कम परस्पर काढून आर्थिक फसवूक होत असल्याचे चित्र आहे. बँकेच्या नावाने होणारी ही आर्थिक लूट रोखण्यासाठी बँक ऑफ इंडियाने पुढाकार घेतला आहे.

एकात्मतेच्या संस्कृतीद्वारे राष्ट्राची समृद्धी या हा उद्देश समोर ठेवून बँक ऑफ इंडियामार्फत १५ नोव्हेंबरपर्यंत दक्षता जागरूकता

### बँक ऑफ इंडिया रायगड विभागाच्या स्तुत्य उपक्रमाला प्रतिसाद

सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. रायगड जिल्ह्यात बँक ऑफ इंडियाच्या ४३ शाखा आहेत. या शाखांनी जिल्ह्यात वेगवेगळ्या ठिकाणी शुक्रवारी (दि. २०) सतर्कता जागृत अभियानांतर्गत ग्रामसभा घेतली. झोनल मॅनेजर मुकेश कुमार व डेप्युटी झोनल मॅनेजर बिरेन चॅटर्जी यांच्या मार्गदर्शनानुसार बँक ऑफ इंडिया रायगड झोनतर्फे विविध ग्रामीण व निमशहरी शाखांमध्ये विविध शाखांच्या शाखा व्यवस्थापकांनी ग्रामसभा आयोजित केल्या होत्या. ज्यामध्ये ग्राहकांना फसवणुकीशी संबंधित माहिती देऊन जागरूक करण्यात आले. या बैठकीत ग्राहकांना ओटीपी शेअर करू नका, एटीएम पिन आणि सायबरलिंक शेअर करू नका. जास्त व्याज असणारे कर्ज घेऊन कर्जाच्या विळख्यात अडकू नका असे सांगण्यात आले. तसेच ग्राहकांना कसे फसवले याची माहितीदेखील देण्यात आली.

# पथविक्रेता समिती निवडणूक

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड-जंजिरा नगरपरिषदेतील नोंदणीकृत पथ विक्रेत्यांमधून आठ जणांची नगरपथविक्रेता समितीमध्ये निवड करण्याकरिता आरक्षण व निवडणूकीचे कार्यक्रम जाहीर झाले आहेत. ४ ऑक्टोबर रोजी नगरपरिषद कार्यालयातील सभागृहात निवडणूक गुप्त मतदान होणार आहे. यामध्ये सर्वसाधारण ३ सदस्य, अनु. जाती १ सदस्य, अनु. जमाती १ सदस्य, इतर मागासवर्ग १ सदस्य, अल्पसंख्याक १ सदस्य, दिव्यांगी १ सदस्य असे एकूण ८ सदस्य असणार आहेत. एकूण निवडून द्यावयाच्या सदस्यांपैकी ३ जागा महिलांसाठी राखीव असतील. सर्वसाधारण प्रवर्ग १ व इतर २ अनु. क्रमांक २ ते ६ पैकी सोडतीने निश्‍चित करण्यात येणार आहे.

# समुद्रकिनारा झाला स्वच्छ




**। कोर्लई । वार्ताहर ।**

शासनाच्या ‘स्वच्छ सागर सुरक्षित सागर’ अभियानांतर्गत आंतरराष्ट्रीय सागर किनारा स्वच्छता दिनानिमित्ताने मुरुडमध्ये नगरपरिषद, भारतीय तटरक्षक दल, वसंतराव नाईक महाविद्यालय-राष्ट्रीय सेवा योजना, अंजुमन इस्लाम जंजिरा महाविद्यालय, सर एस.ए.हायस्कूल व तळा येथील जी.एम.वेदक महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छता अभियान राबवून समुद्रकिनारा चकाचक केला.

वसंतराव नाईक महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.एस.एस.भैरगुंडे व डॉ. गजानन मुनेश्‍वर यांच्या पुढाकाराने तसेच नगरपरिषदेच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या या अभियानात १४५ स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या अभियानांतर्गत दि. १५ ते दि.२० सप्टेंबर रोजी महाविद्यालयात पोष्टर, रांगोळी व सुविचार स्पर्धा घेण्यात आल्या. आंतरराष्ट्रीय सागर किनारा स्वच्छता दिनानिमित्ताने सागर किनारा स्वच्छता अभियान मोहिमेसाठी नगरपरिषदेतर्फे हॅंडग्लोज, मास्क, पाणी, अल्पोपहार तसेच ट्रॅक्टर ट्रॉली, बीच क्लिनिंग मशीन सोयीसुविधा दिल्या होत्या.

यावेळी विद्यार्थी, शिक्षक तसेच नगरपरिषदेतील आरोग्य निरीक्षक राकेश पाटील, कपिल वेल्हे, प्रशांत दिवेकर, सतेज निमकर, सचिन कोरके, अनिकेत भोसले, अभिजित चांदोरकर, तटरक्षक दल अधिकारी, कर्मचारी वृंद यांनी या स्वच्छता अभियानात उत्स्फूर्तपणे सहभाग घेऊन समुद्रकिनाऱ्यावरील दोन टन कचरा गोळा करण्यात आला.

# एमएमबी मार्फत स्वच्छता मोहीम

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

किनारे स्वच्छ राहिले पाहिजे हा उद्देश समोर ठेवून महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डतथा एमएमबी विभागाने नुकतीच स्वच्छता मोहीम समुद्रकिनारी राबवली आहे. अलिबागमधील समुद्रकिनारी पडलेला कचरा गोळा करून परिसर स्वच्छ करण्याचे काम या विभागामार्फत करण्यात आले. ‘स्वच्छता हीच सेवा’ हा ध्यास घेत या उपक्रमात कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

‘स्वच्छता हीच सेवा’ हे अभियान १४ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत राबविण्यात येते आहे. महाराष्ट्र सागरी मंडळाचे प्रादेशिक बंदर अधिकारी कॅप्टन संजय उगलमुगले यांच्या मार्गदर्शनाखाली अलिबाग समुद्रकिनारी गुरुवारी महाराष्ट्र सागरी मंडळ आणि विविध व्यावसायिकांच्या विद्यमाने स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. स्वच्छता



मोहिमेचे नियोजन अलिबागचे बंदर निरीक्षक प्रवीणकुमार पाटील यांच्या मार्फत करण्यात आले. समुद्रकिनाऱ्यावर पडलेला कचरा गोळा करून त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यात आली. या अभियानाला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. कर्मचाऱ्यांसह व्यवसायिकांनी स्वयंस्फुर्तीने या अभियानात सहभाग घेऊन संपुर्ण अलिबागमधील समुद्रकिनारी स्वच्छ केला.

# महिला सुरक्षितता विषयावर कार्यशाळा

**। उरण । वार्ताहर ।**

उरण येथील कोकण ज्ञानपीठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने महिला सुरक्षिततेबाबत सद्यस्थितीत अस्तित्वात असलेले कायदे व महिला सुरक्षितता/गुन्हे नोंद या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य के. ए. शामा यांनी केले. मुलींची सुरक्षितता, अध्यात्मिक जीवनशैली इत्यादी विषयांवर भाष्य करून विद्यार्थिनींनी आत्मचिंतन करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक पराग म्हात्रे यांनी घरगुती छळ व घराबाहेरील छळ याला कसे टाळले पाहिजे याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. निकिता कासारे यांनी स्त्रीभ्रूण हत्या, हुंडा पद्धती, लैंगिक छळ, घरगुती अत्याचार, बेटी बचाव बेटी पढाव इत्यादी मुद्द्यांना स्पर्श करून विद्यार्थिनींनी सेल्फ डिफेन्सचे प्रशिक्षण घेतले पाहिजे, असे सांगितले. संघश्री गायकवाड यांनी भारतीय न्याय संहिता, ऑनलाइन फीसिंग, सायबर क्राईम, माहिती तंत्रज्ञानातून घडलेले गुन्हे इत्यादी विषयावर सविस्तर भाष्य केले. तसेच, वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांनी उपस्थित विद्यार्थिनींना महिला सुरक्षितता व गुन्हे नोंद या विषयावर मार्गदर्शन करताना अडचणींच्या काळात ११२, १०९७, १९३० या टोल फ्री नंबरवर संपर्क करण्याची सूचना दिली.

# एसटी बसच्या अपघातात सात प्रवासी जखमी

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

मुंबई-पुणेद्रुतगतीमहामार्गावरील बोरघाटातील खोपोली बायपासजवळ असणाऱ्या नवीन बोगद्यात मुंबई लेनवरील अपघातात बसमधील नियंत्रण सुटल्याने सहा प्रवासी व बसचालक जखमी झाला. जखमींना एमजीएम रुग्णालय कळंबोली येथे दाखल करण्यात आले आहे. ही घटना शुक्रवारी सकाळी ९ वाजताच्या सुमारास घडली.



सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बोरघाटातील नवीन बोगद्यात राज्य परिवहन महामंडळाची बस क्र. एमएच-१४ बीटी-४९८९ पुणे ते मुंबई अशी जात असताना चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले व बस समोर जाणाऱ्या वॅगनारला धडकली. कार क्र. एमएच-१४ केए ७४०२ ला पाठीमागून ठोकर मारली. या अपघातात सहा प्रवासी व एसटी बसचालक जखमी झाले. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, किरकोळ जखमींवर उपचार करून सोडून देण्यात आले आहे.

# पिसाळलेला कुत्रा चावलेल्या तरूणाचा हृदयविकाराने मृत्यू

**। रसायनी । वार्ताहर ।**

रसायनी परिसरातील रिस येथे एका भटक्या पिसाळलेल्या कुत्र्याने थैमान घातले होते. या कुत्र्याने रस्त्यावर ये-जा करणाऱ्या नागरिक व महिला, लहान मुली अशा नऊ जणांना चावा घेतला. त्यामुळे ज्या नागरिकांना कुत्र्याने चावले आहे, त्यांनी परिसरातील निरामय हॉस्पिटल व चौक ग्रामीण रूग्णालय येथे धाव घेतली व इंजेक्शन आणि मलमपट्टी केली.

दरम्यान, भैरवनाथ टेडरसमोरच असणारे सलूनचे मालक संजू उर्फ शरीफ शेख (३४) हे रस्त्यावर संध्याकाळी सहा वाजता आले असताना ह्या भटक्या कुत्र्याने त्यांना चावा घेतला. त्यामध्ये ते पूर्णतः घाबरले होते. त्यांनी तात्काळ चौक येथे जाऊन मलमपट्टी व इंजेक्शन घेतले; परंतु त्याच दिवशी रविवारी संध्याकाळी हॉस्पिटलमधून येऊन दुकानात काम करू लागले. त्यांच्या छातीमध्ये चमक आल्यामुळे त्यांनी निरामय हॉस्पिटल गाठले. डॉक्टरांनी त्यांना पनवेल येथे जाण्यास सांगितले. परंतु, पनवेलमध्ये हॉस्पिटलला जात असताना त्यांना हृदयविकाराचा झटका आल्यामुळे त्यांची प्राणज्योत मालवली.

या कुत्र्याने दीड वर्षाची मुलगी, दहा वर्षाची मुलगी, तीन तरूण, सात ते आठ महिला यांना चावा घेतल्याची माहिती मिळाली आहे. ही घटना घडली असतानाही रसायनी परिसरात ठिकठिकाणी कुत्र्यांचा ग्रुपने वावर दिसून येत असून, महिला व नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण झाले आहे. यासाठी वासांबे मोहोपाडा ग्रामंचायतीने मोहोपाडा व रिस परिसरात मोकाट फिरणाऱ्या श्‍वानांची नसबंदी करण्याचा निर्णय घेतला असून, याला पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांनी दुजोरा दिला आहे.

# फरार तोतया अधिकाऱ्यास ठोकल्या बेड्या

### संकेत कांबळे पोलिसांच्या जाळ्यात

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

२०१९ पासून फसवणुकीचे विविध गुन्हे दाखल असलेला तोतया सरकारी अधिकारी संकेत कांबळे यास नेरळ पोलिसांच्या पथकाने नवी मुंबई येथून ताब्यात घेतले. ओळख लपवून राहात असलेल्या संकेत कांबळे यास नेरळ पोलिसांच्या पथकाने पकडून आणले असून, या तोतया अधिकाऱ्यावर नेरळ पोलीस ठाणे तसेच कराड, सातारा, खैरवाडी, चेंबूर, अंधेरी, पनवेल ग्रामीण, खडक पुणे आदी पोलीस ठाण्यात फसवणुकीचे गुन्हे दाखल आहेत.

नेरळ पूर्व भागात राहणारा संकेत कांबळे हा तरुण मंत्रालयात गृह विभागात वरिष्ठ पदावर नोकरीत आहे असे भासवून खुद्द पोलिसांना विविध पदांची आमिषे दाखवून त्यांची फसवणूक करीत असल्याचे संशय येत होते. तो आणि त्याची पत्नी तोतया सरकारी अधिकारी असल्याचे बोलले जात असतानादेखील नेरळ पोलीस ठाण्यातील तत्कालीन अधिकारी संकेत कांबळे यास मंत्रालयातील अधिकारी म्हणून मोठा मान सन्मान देत होते. त्यात त्याची पत्नी आणि संकेत यांच्यातील वयाचे अंतर बघता त्या दोघांचे नाते काही तरी गौडबंगाल असल्याचे सातत्याने बोलले जात होते. एक्झिक्युटिव्ह दर्जाचे कपडे आणि हातात आय फोन घेऊन अधिकारी वर्गासाठी भाषा वापरणाऱ्या या संकेत कांबळे हा मुंबईऐवजी नेरळ पूर्व भागात भाड्याच्या घरात राहात होता. नेरळ पोलीस ठाण्यात दर आठवड्याला वावरणाऱ्या संकेत कांबळे याने नाव बदलून वावरणाऱ्या त्याच्या पत्नीने नोकऱ्यांची आमिषे दाखवून अनेकांकडून मोठ्या आर्थिक रकमा जमा केल्या होत्या. आणि नोकऱ्या लावण्यात अडचणी येत असल्याची करणे सांगून हे दाम्पत्य २०१९ मध्ये नेरळ येथून अचानक गायब झाले आणि त्यानंतर त्या दोघांचे महाप्रताप समोर आले.

२०१९ पासून अनेकांना गंडा घालणारा संकेत विकास कांबळे यांच्यावर नेरळ पोलीस ठाणे येथे २०१९ मध्ये दोन गुन्हे दाखल आहेत. फसवणुकीच्या गुन्ह्यामध्ये नेरळ पोलिसांच्या हिट लिस्टवर असलेला संकेत कांबळे हा नवी मुंबई येथे नाव बदलून वावरत असल्याचे माहिती नेरळ पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार नेरळ पोलिसांनी सापळा रचून १८ सप्टेंबर रोजी नवी मुंबईत सापळा रचला. सहायक पोलिस निरीक्षक शिवाजी ढवळे यांच्या पथकाने तोतया सरकारी अधिकारी असलेल्या संकेत विकास कांबळे यास पकडून नेरळ येथे आणले. या कांबळेवर नेरळ पोलीस ठाण्यासह विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत.

# अभिनव ज्ञान मंदिर द्वितीय

**। तळा । वार्ताहर।**

महाराष्ट्र शासनाने आयोजित केलेल्या सन २०२४-२५ या वर्षी ‘मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा’ टप्पा दोन या स्पर्धेत अभिनव ज्ञान मंदिर उसर खुर्द विद्यालयाचा तालुक्यात द्वितीय क्रमांक आलेला आहे. द्वितीय क्रमांकाचे रुपये २ लाख पारितोषिक विद्यालयास पात्र झाले आहे. या अभियानाच्या माध्यमातून शाळांमध्ये विविध प्रकारचे सामाजिक बांधिलकीचे उपक्रमांचा समावेश होता.

# सहाय्यक गटविकास अधिकारीपदी नारंगीकर

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

बेलापूर येथील कोकण भवन राज्य व्यवस्थापन कक्ष येथे या विभागातील सहाय्यक गटविकास अधिकारी/नियंत्रण अधिकारी हे पद रिक्त झाले होते. या पदावर उरण पंचायत समितीचे विस्तार अधिकारी अनिल नारंगीकर यांना ग्रामविकास विभाग शासन आदेशानुसार, २० सप्टेंबर पदोन्नती मिळाल्यामुळे प्रतिनियुक्तीने त्यांची नियुक्ती ग्रामिण गृह निर्माण विभागात सहाय्यक गटविकास अधिकारी/नियंत्रण अधिकारीपदी करण्यात आली आहे. लवकरच ते आपल्या पदाचा पदभार स्विकारून कामकाजाला सुरुवात करणार असल्याचे त्यांनी सांगितले.



दरम्यान, माणगाव व उरण येथे ग्रामसेवक म्हणून पाच वर्ष, तर ग्रामविकास अधिकारी म्हणून उरण, पनवेल येथे नऊ वर्ष आणि विस्तार अधिकारी म्हणून उरण, पनवेल, पेण येथे वीस वर्ष अशी एकूण ३४ वर्ष त्यांनी उत्तम रीतीने सेवा बजावली. यामध्ये विविध पदांवर सेवा बजावताना, कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना नेहमीच मार्गदर्शन करून सहकार्य केले. आपल्या सेवेसी प्रामाणिक असणाऱ्या अनिल नारंगीकर यांची सहाय्यक गटविकास अधिकारीपदी नियुक्ती करण्यात आल्याबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल जिल्हा स्तरावरुन डेप्युटी इंजिनिअर देवांग, माजी अति. मुख्य कार्यकारी अधिकारी वसंत पाटील व शेलके, माजी गटविकास अधिकारी तेटगुरे, इंजिनियर अनिल जाधव, जिल्हा व तालुक्यातील गटविकास अधिकारी, ग्रामविकास अधिकारी व ग्रामसेवक या सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले.

# समुद्रकिनारे झाले चकाचक

### ग्रीन अँड ग्रीन इंडिया इंटरनॅशनल संस्थेचा स्तुत्य उपक्रम

**। अलिबाग । वार्ताहर ।**

दरवर्षीप्रमाणे सप्टेंबर महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यातील येणारा शनिवार हा जगभरात जागतिक किनारपट्टी स्वच्छता दिवस म्हणून साजरा केला जातो. यंदाही तालुक्यातील अलिबाग, किहीम, वरसोली, आवास किनारपट्टीची ग्रीन अँड ग्रीन इंडिया इंटरनॅशनल या संस्था रायगड युनिटच्या स्वयंसेवकांनी उत्स्फूर्तपणे स्वच्छता करुन किनारे चकाचक केले.




दरवर्षी जगभरात यादिवशी त्या त्या विभागातील जवळची किनारपट्टी स्वयंसेवकाकडून स्वच्छ केली जाते. हजारो टन कचरा यादिवशी वेचून त्याची योग्य विल्हेवाट लावली जाते. या पार्श्‍वभूमीवर शनिवारी ग्रीन अँड ग्रीन इंडिया इंटरनॅशनल या संस्थेच्या रायगड युनिटने अलिबाग, किहीम, वरसोली आणि आवास या किनारपट्टीवर किमान पंधरा कि.मी. अंतरावरील कचरा उचलून किनारपट्टी स्वच्छ केली. यावेळी ग्रीन अँड ग्रीन इंडिया इंटरनॅशनल संस्थेचे अध्यक्ष बिपुल हजारिका, संस्थेचे मुख्य दिशादर्शक चारलिंग गोगाई, संस्थेचे महाराष्ट्र प्रमुख संतोष थोरात, संयोजक अतुल कोठारी, संतोष पूरव, सागर थोरात, राहुल जोशी, मल्हार थोरात, पायल आंब्रे, रत्नाकर घरत व मोठ्या संख्येने स्वयंसेवक उपस्थित होते.

# ‘पसंतीच्या वाहन नोंदणी क्रमांकासाठी अर्ज करावेत’

**। पनवेल, वार्ताहर**

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पनवेल येथे त-क-छ ४.० या संगणक प्रणालीवर परिवहन संवर्गातील मालवाहू वाहनांसाठी सध्या सुरू असेलेली एमएच ४६ सी एल मालिका संपल्यानंतर तात्काळ नवीन मालिका एम एच ४६ सीयू सुरू करण्यात येणार आहे. अटींच्या अधिन राहून आकर्षक व पसंतीच्या वाहन नोंदणी क्रमांकासाठी अर्ज (विहीत शुल्काच्या धनाकर्यासह डीडी.) २५ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्विकारून पसंतीचे व आकर्षक क्रमांक विहीत शुल्क आकारून आरक्षित करण्यात येतील.

एका पसंतीच्या/आकर्षक क्रमांकासाठी एकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास त्यांच्याकडून दि.२५ सप्टेंबर रोजी अतिरिक्त रकमेचे धनाकर्ष (डीडी) दुपारी १ वाजेपर्यंत सीलबंद लिफाप्यात स्वीकारले जातील. त्याच दिवशी दुपारी ४ वाजता सदर सीलबंद लिफाफे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे दालनात उपस्थित अर्जदारांसमक्ष उघडण्यात येतील. विहीत नियमांनुसार पसंतीचे/आकर्षक क्रमांक आरक्षित करण्यात येतील.

# अपघातात एकाचा मृत्यू

**। पनवेल । वार्ताहर ।**

मुंबई-पुणेद्रुतगतीमहामार्गावर पुणे लेनवर किमी १३/९५० पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीत तीन वाहनांच्या झालेल्या अपघातात कारमधील एकाचा मृत्यू झाला आहे. यातील कार क्रमांक एमएच १४ डीई ३७०० यावरील चालक अक्षय राजेंद्र पाटील (वय २५, रा. ता. भोकरदरन जि. जालना) हे आपल्या ताब्यातील वाहन घेऊन पुणे बाजूकडे जात असताना किलोमीटर १३/९५० या ठिकाणी तिसऱ्या लेनने जात होते. पुढे चाललेल्या गॅस टँकर क्रमांक यूपी ७० एचटी १६०७ यास ओव्हरटेक करताना वाहनावरील ताबा सुटल्याने टँकरला पाठीमागून जोरात ठोकर मारली आणि कार मध्ये बाजूला बसलेले देवेंद्रसिंग करणसिंग राजपूत (२४, रा पिशोर ता.कन्नड, जि.संभाजीनगर) याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने रुग्णवाहिकेवरील डॉ. रामदास भगत यांनी त्याला जागीच मयत घोषित केले. तसेच सुरज दीपक कुदळे (२४, रा. ता.भोकरदरन जि.जालना) याच्या डोक्याला, कमरेला मुकामार लागल्याने चौक ग्रामीण रुग्णालय येथे पाठवण्यात आले. कार चालक अपघात ठिकाणावरून पळून गेला. या अपघातप्रकरणी पोलीस चालकाचा शोध घेत आहेत.

# दिव्यांग मुलीवर लैंगिक अत्याचार

### ५० वर्षांचा नराधम अटकेत

**रेवदंडा :** दिव्यांग अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या ५० वर्षीय नराधमाला रेवदंडा पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहे. त्याने तिला ठार मारण्याची धमकी दिली होती. मुरूड तालुक्यातील मिठेखार येथे घडलेली ही जुलैमधील घटना आहे. पीडित पंधरा वर्षांची दिव्यांग मुलगी आहे. ती घरात एकटी असताना मिठेखार (पो. वळके ) गणपत डोलकर हा ५० वर्षीय नराधम तिच्या घरात घुसला आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. याबाबत कोणाला काही सांगितले तर हत्या करण्याचीही धमकी दिली. दोन ते तीन वेळा हा प्रसंग तिच्यासोबत घडला. आईने विचारपूस केल्यावर मुलीने सर्व प्रकार सांगितला. यानंतर रेवदंडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, गणपत याला अटक करण्यात आली आहे.

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली जमिन मिळकती त्यांच्या मालकाकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविलेले आहे.

**मौजे-हुमगाव, तालुका-कर्जत, जि.-रायगड येथील जमिन मिळकती**

| मालकाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे आर.पॉं. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| भुषण विलास महाडिक | ३७/२/फ | १ | ०-६०-७५ | ०-५१ |
| भुषण विलास महाडिक<br>अमिरी भुषण महाडिक | ३७/२/अ | ३ | ०-६०-०० | ०-३५ |

सदरच्या जमीन मिळकती ह्या वरील मालकांच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीची असून त्या विकत देण्याचा त्यांना हक्क अधिकार असल्याने त्यांनी सदरील मिळकती या तद्ंगभुत हक्क हितसंबंधासह आमचे अशिलांना विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेली मिळकती संदर्भात इतर कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साडेकरार, मृत्युपत्रांकीत दान, कुळवहिवाट, बोजा, चार्ज लिन, ताबेकब्जा वगैरे कोणतेही प्रकारचा हक्कहित संबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासून ७ दिवसांचे आत खाली सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती नोंदवाव्यात. मात्र दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील व मुदती नंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर कोणतेही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दिनांक २२/०९/२०२४

अधिवक्ता
**स्वप्निल बाबूराव देशमूख**
ऑफिस पत्ता. शॉप नं. २४, मार्वल क्षिप्रा
मुद्रे खुर्द ता. कर्जत जि. रायगड
९२७३२२४६८०/८८३०५६०९६२

**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनात्री जमिन मिळकत तिचे मालक आशिष चारुवत्त देसाई यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे-मोहिली तर्फे वासरे तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्रं व उपविभाग /सर्व्हे नंबर /हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| २८/२/अ | एकुण क्षेत्र ०-४७-५० हे आर पॉ यापैकी वरील मालक यांचे क्षेत्र ०-२०-०० हे आर पॉ | ४-८१ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लोज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ (एकवीस) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक : २२/०९/२०२४ **ॲड. निलेश कान्हु मोरे** मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत
गॅस समोर, अमराई रोड, कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१

कृषीवल
रायगड, रविवार, दि. २२ सप्टेंबर २०२४
किंमत ४ ₹

## गडकरींनी राज्य सरकारला फटकारले

**पुणे :** केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी राज्य सरकारला फटकारले असून, नोटीस पाठविण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मुंबई-पुणे, कल्याण-नगरच्या दुरवस्थेवरुन गडकरींनी स्पष्ट शब्दांत नाराजी व्यक्त केली. तीन महिन्यांत रस्ते दुरुस्त करा, अन्यथा ते रस्ते ताब्यात घेतो, असा अल्टिमेटमही गडकरींनी दिला आहे. रस्ते राज्य सरकारच्या ताब्यात आहेत. पण शिव्या मला पडतात, असं गडकरी पुण्यातील प्रकल्पांच्या भूमीपूजन सोहळ्यात म्हणाले. दरम्यान, जुना मुंबई-पुणे महामार्ग आणि कल्याण नगरच्या पुढील दोन टोल सरकार घेत असून, रस्ता पूर्ण खराब झाला आहे. हे ताबडतोब दुरुस्त करा, असे आदेश नितीन गडकरींनी दिले आहेत.

## दिल्लीत आता ‘आतिशी सरकार’

**नवी दिल्ली :** आम आदमी पक्षाच्या नेत्या आतिशी मार्लेना यांनी शनिवारी (दि.२१) दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. सुषमा स्वराज, शीला दीक्षित यांच्यानंतर त्या दिल्लीच्या तिसऱ्या महिला मुख्यमंत्री बनल्या आहेत. मुख्यमंत्री आतिशी यांच्यासोबत मुकेश अहलावत, इम्रान हुसेन, गोपाल राय, सौरभ भारद्वाज आणि कैलाश गहलोत या आप नेत्यांनीदेखील मंत्रीपदाची शपथ घेतली. दिल्लीतील राज निवास येथे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना यांनी आतिशी यांना मुख्यमंत्री पद आणि गोपनियतेची शपथ दिली. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी पदाचा राजीनामा देण्याची घोषणा केली. यानंतर केजरीवाल यांनी मुख्यमंत्रीपदाची सूत्रं आतिशी यांच्याकडे सोपवण्याचा निर्णय घेतला.

### वे|ध|क

## निवडणुका उद्याच घेण्याचे आदेश!

**मुंबई :** मुंबई विद्यापीठाच्या सिनेटच्या निवडणूका उद्याच घेण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. मुंबई विद्यापीठाने सिनेटच्या निवडणुका शुक्रवारी अचानक पुढे ढकलल्या होत्या. विद्यापीठाच्या या निर्णयाविरोधात ठाकरे गटाने कोर्टात धाव घेतली होती. आणि सिनेटच्या निवडणुकीच्या स्थगितीच्या निर्णयाला कोर्टात आव्हान दिले होते. अखेर न्यायालयाने मुंबई विद्यापीठाला या निर्णयाविरोधात फटकारले असून, सिनेटच्या निवडणुका या उद्याच घ्या, असे आदेश दिले आहेत. त्यामुळे आता रविवारी २२ सप्टेंबरलाच मुंबई विद्यापीठाची निवडणूक होणार आहे.

# तीन विद्यार्थ्यांना चिरडले

## नेरळमध्ये ‘हिट अँड रन’ — एकाचा मृत्यू; दोघे गंभीर

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत-कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर शनिवारी (दि. २१) सकाळी सात वाजता नेरळ विद्या मंदिर कनिष्ठ महाविद्यालयात जात असलेल्या तीन विद्यार्थ्यांना कुडाळ अंबरनाथ प्रवास करणाऱ्या इर्टिका गाडीने उडवल्याने हिट अँड रनची घटना घडली. रस्त्याच्या कडेने चालत कॉलेजमध्ये जाणाऱ्या विद्यार्थ्यांना धडक दिल्यानंतर त्यातील एक विद्यार्थी गाडीच्या चाकाखाली गेल्याने गंभीर जखमी



मृत-मयुर पारधी, जखमी-भगवान पारधी, विशाल दरवडा

असलेल्या विद्यार्थ्याचा रुग्णालयात मृत्यू झाला आहे.दरम्यान, या हिट अँड रनप्रकरणी नेरळ पोलिसांनी गाडीचा चालकास अटक केली आहे.

नेरळ ग्रामपंचायत हद्दीमधील जुम्मापट्टी भागातील टेकडीवर असलेल्या धसवाडी येथील विद्यार्थी हे डोंगर उतरून टपाल





वाडी येथे येतात आणि तेथून कर्जत-कल्याण रस्त्याने चालत नेरळ विद्या मंदिर तसेच कनिष्ठ महाविद्यालय येथे जात असतात. धसवाडी तसेच नेरळ गावातील सर्वच विद्यार्थी हे असेच सकाळी शाळेत तसेच महाविद्यालयात जात असतात आणि सायंकाळी घरी परतत असतात. मात्र, नेरळ गावातील पोलीस ठाण्यापासून विद्या मंदिर शाळेपर्यंत असलेला रस्ता एकेरी आहे. त्यामुळे या भागात असलेला रस्ता दुपदरी करावा, अशी अनेक वर्षांची मागणी आहे. शनिवारी सकाळी भगवान सखाराम पारधी, विशाल आलू दरवडा (बारावी) आणि मयूर मोहन पारधी हा अकरावी कला •> पान ४ वर

### आदिवासी आक्रमक

नेरळ येथील हिट अँड रन प्रकरणी आदिवासी विद्यार्थ्याचा मृत्यू झाला असून, अन्य दोन विद्यार्थी गंभीर आहेत. याप्रकरणी संबंधित रस्त्याची जबाबदारी असलेले विभाग आणि गाडीचे चालक यांना जबाबदार धरण्यात यावे, या मागणीसाठी आदिवासी समाज आक्रमक झाला आहे. नेरळ येथे रस्त्याच्या कडेने दररोज जाणाऱ्या विद्यार्थ्यांना अरुंद रस्त्यांमुळे अपघात झाला. त्यात गाडीने विद्यार्थ्यांना उडविले. त्याआधी कर्जत-कल्याण रस्त्याने प्रवास करताना जेनी ट्युलिप •> पान ४ वर



## गणरायाचे आगमन

### साखर चौथच्या गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना

। अलिबाग । प्रतिनिधी ।

दहा दिवसांच्या बाप्पाच्या विसर्जनानंतर साखर चौथच्या गणरायाच्या आगमनाची प्रतीक्षा लागून राहिली होती. अखेर ही उत्कंठा संपली. जिल्ह्यामध्ये शनिवारी (दि.२१) साखर चौथच्या ८७९ गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली. त्यात ४९१ घरगुती व ३८८ सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांमार्फत गणेशमूर्ती विराजमान करण्यात आली. मिरवणूक काढत बाप्पाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

मूर्तीकार मूर्ती तयार करण्यामध्ये मग्न असल्याने गणेशोत्सवामध्ये गणरायाची प्रतिष्ठापना करता येत नाही. त्यामुळे •> पान ४ वर





## स्वसंरक्षणाला प्राधान्य द्या



- माजी आ. पंडित पाटील यांचे महिलांना आवाहन
- महिला सुरक्षितता आणि शिष्यवृत्तीबाबत कार्यशाळा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

महिला सुरक्षिततेचा प्रश्न अतिशय गंभीर असून, समाजाने सजग असले पाहिजे. स्वतःच्या संरक्षणासाठी महिलांनी पुरेशी काळजी घेतली पाहिजे. शासकीय उपाययोजना असतातच; परंतु या उपायोजनांच्या सोबत आपण स्वतःची सुरक्षितता प्राधान्य मानून सामाजिक जीवन जगले पाहिजे. समाज माध्यमांचा वापर करताना भान ठेवून, आपण फसवले जाणार नाहीत याची काळजी घेतली पाहिजे, असे आवाहन माजी आ. पंडित पाटील यांनी केले.

महिला सुरक्षितता आणि शिष्यवृत्ती याबाबत पेझारी येथील कार्यशाळा •> पान ४ वर

## माथेरानची राणी बाराही महिने धावणार?

### पावसाळी सुट्टीनंतर १५ ऑक्टोबरपासून प्रवाशांच्या सेवेत

। नेरळ । प्रतिनिधी ।

पर्यटकांचे आवडीचे ठिकाण असलेल्या माथेरान या पर्यटनस्थळी पर्यटक प्रवाशांना नेणारी नेरळ-माथेरान-नेरळ अशी मिनीट्रेन सेवा १५ ऑक्टोबरपासून पुन्हा पर्यटकांच्या सेवेत येत आहे. यावर्षी ७ जूनपासूनच माथरोनची राणी पावसाळी सुट्टीवर गेली होती. मात्र, मिनीट्रेनची माथेरान ते अमन लॉज प्रवासी सेवा पावसाळ्यातदेखील कायम सुरु होती. दरम्यान, २०२५ मध्ये पावसाळ्यातदेखील मिनीट्रेनची सेवा सुरु ठेवण्यावर मध्य रेल्वे प्रशासनाकडून नियोजन सुरु असून, आगामी काळात वर्षाच्या बाराही महिने मिनीट्रेन नेरळ-माथेरान मार्गावर चालविली जाण्याची शक्यता मध्य रेल्वेकडून सुरु असलेल्या कामांमुळे निर्माण झाली आहे.



माथेरानचे डोंगरातील माती पावसाळ्यात कोसळून खाली असते. त्यामुळे दरडी कोसळण्याचे प्रमाण मोठे असून, २१ किलोमीटर अंतर पार करीत माथेरान डोंगरातून जाणारी नेरळ-माथेरान-नेरळ अशी मिनीट्रेन सेवा बंद केली जाते. ब्रिटिश काळापासून पावसाळ्यात १५ जूननंतर १५ ऑक्टोबरपर्यंत मिनीट्रेनची नेरळ- माथेरान-नेरळ अशी सेवा बंद असते. •> पान ४ वर

### माथेरान वस्तीची गाडी सुरु करावी

नेरळ–माथेरान–नेरळ या मार्गावर मागील पर्यटन हंगामात दररोज केवळ दोनच गाड्या चालविल्या जात होत्या. नेरळ येथून सकाळी आठ वाजून ५० मिनिटे आणि दहा वाजून २५ मिनिटे या वेळेत दोन गाड्या चालविल्या जात आहेत. या दोन्ही गाड्यांशिवाय माथेरान येथे जाण्यासाठी नेरळ येथून सायंकाळी पाच वाजता गाडी सोडली जायची. ती माथेरान वस्तीची समजली जाणारी गाडी पुन्हा सुरु करावी, अशी मागणी ही गाडी बंद केल्यापासून २००६ पासून केली जात आहे. सदर गाडी पुन्हा सुरु करावी, अशी मागणी माथेरानमधील व्यापारी आणि माथेरान नागरी पतसंस्थेचे तज्ज्ञ संचालक गिरीश पवार यांनी माथेरान व्यापारी फेडरेशनकडून केली आहे.



पान ३ वरून

## तीन विद्यार्थ्यांना चिरडले

शाखेत शिकणारा, असे तिघे विद्यार्थी कॉलेजमध्ये जाण्यासाठी घरातून निघाले होते. सात वाजण्याच्या सुमारास ते तिघे रस्त्याच्या डाव्या बाजूने चालत असताना त्यांच्या मागाहून येणाऱ्या एमएच ०५ सीव्ही २८३४ या पांढऱ्या इर्टिका गाडीने या तिन्ही विद्यार्थ्यांना धडक दिली.

गाडीने दिलेली धडक एवढी प्रचंड होती की मयूर पारधी हा विद्यार्थी थेट गाडीच्या चाकाखाली गेला. तर, दुसरे दोन विद्यार्थी हे गाडीच्या बोनेटवरून थेट गाडीच्या काचेवर जाऊन आदळले. त्यामुळे जखमी झालेल्या तिन्ही विद्यार्थ्यांना वाचविण्यासाठी तेथील अनेक ग्रामस्थ आणि रस्त्याने जाणारे विद्यार्थी पोहोचले. त्यामुळे इर्टिका गाडीचा चालक लोचन दिलीप धुरी याने स्थानिकांच्या मदतीने डॉ. शेवाळे यांच्या रुग्णालयात नेले. मात्र, जखमी विद्यार्थ्यांना झालेल्या जखमा पाहून मलमपट्टी करून तात्काळ बदलापूर येथे नेण्यास सांगितले.कॉलेजचे प्रा. हनुमंत भगत हे विद्यार्थ्यांच्या सोबत बदलापूर येथील डॉ. कुलकर्णी यांच्या रुग्णालयात नेण्यास रुग्णवाहिकासह पुढे निघाले. तर, पोलिसांनी खबरदारी म्हणून अपघातास कारणीभूत असलेला गाडीचा चालक लोचन धुरी यास पोलीस ठाण्यात अपघातग्रस्त गाडीसह नेले. बदलापूर येथील खासगी रुग्णालयात भगवान सखाराम पारधी आणि विशाल आलू दरवडा या दोघांवर उपचार सुरू आहेत. तर, गाडीच्या चाकाखाली गेलेला मयूर पारधी यास डोंबिवली येथील एम्स रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र, उपचार घेत असताना मयूरचा रक्तपुरवठा थांबला आणि त्यामुळे त्याचा मृत्यू झाला. या अपघातात गाडीच्या चाकाखाली गेल्याने मयूरच्या पायाचे तुकडे झाले होते, तर डोक्याला जखमा झाल्याने त्याचा मृत्यू झाला असून, शवविच्छेदनानंतर त्याचा मृतदेह नेरळ धसवाडी येथे आणला जाणार आहे.

### आदिवासी आक्रमक

**शाळेसमोर असलेल्या गतिरोधकावर गाडीचा वेग कमी नव्हता, अशी माहिती घटना पाहणारे सांगत आहेत. तर, अपघातस्थळ आणि गतिरोधक हे अंतर ५० मीटरदेखील नव्हते आणि त्यामुळे गतिरोधकांवर गाडीचा वेग कमी झाला असता तर पुढे मोहाची वाडी वळणावर अपघात झालाच नसता. दुसरीकडे मोहाची वाडी येथून मोठ्या प्रमाणावर वाहने मुख्य रस्त्यावर येत असतात, तेथे गतिरोधक आवश्यक असताना सार्वजनिक बांधकाम खात्याने गतिरोधक टाकले नाहीत आणि झेब्रा क्रॉसिंग पट्टेदेखील मारले नाहीत. त्यामुळे सकाळी वाहनाची वर्दळ नसताना हा अपघात झाला आणि एका विद्यार्थ्याला आपले प्राण गमवावे लागले आहेत. त्यामुळे या अपघातास जबाबदार असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच रस्त्याचा ठेकेदार आणि चालक यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी आदिवासी संघटना यांच्यावतीने संघटनेचे पदाधिकारी सुनील पारधी यांनी केली आहे. हिट अँड रनने एकाचा बळी आणि दोघांना गंभीर जखमी करणारे इर्टिका गाडी ही कोकणातून रात्रभर प्रवास करून आली होती. कुडाळ ते बदलापूर अंबरनाथ असा प्रवास केल्याने चालकाच्या डोळ्यावर झोप असावी, अशी मोठी शक्यता वर्तवली जात असून, त्याबद्दल अधिक माहिती नेरळ पोलीस घेत आहेत. संबंधित वाहन अंबरनाथ बी केबिन भागातील असून, चालक नशेत होता काय? याचा शोध पोलीस घेत आहेत. नेरळ गावातील अरुंद आणि खड्डेमय रस्त्यामुळे तसेच रस्त्यात आलेली दुकाने यामुळे रस्ता अरुंद बनला असून, त्यावर उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक करीत आहेत.**

## स्वसंरक्षणाला प्राधान्य द्या

पेझारी येथील कोकण एज्युकेशन सोसायटीचे लक्ष्मी-शालिनी महिला महाविद्यालय पेझारी येथे महाराष्ट्र शासन उच्च शिक्षण विभाग आणि मुंबई विद्यापीठाच्या निर्देशानुसार महिला सुरक्षितता आणि शिष्यवृत्ती याबाबत कार्यशाळा घेण्यात आली. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी पंडित पाटील बोलत होते. महाविद्यालयातील महिला विकास कक्षाच्यावतीने महाराष्ट्र शासन उच्च शिक्षण विभाग आणि मुंबई विद्यापीठ यांच्या निर्देशाप्रमाणे कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेचा उद्देश हा प्रामुख्याने महिलांना सक्षम करणे आणि विद्यार्थिनींना विविध प्रकारच्या शिष्यवृत्तीची माहिती देणे हा होता. त्यासाठी महाविद्यालयाच्या परिसरातील विविध क्षेत्रातील तज्ज्ञांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. युवा नेते आणि सामाजिक कार्यकर्ते सवाई पाटील यांच्यासह रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण विभागातील ॲड. गीता म्हात्रे, पोयनाड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष दराडे, अशासकीय संस्थेचे प्रतिनिधी शैलेश कोंडसकर यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. त्यामध्ये महिलाविषयक कायदे, महिला सुरक्षिततेबाबत उपायोजना अशा वेगवेगळ्या विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयातील महिला विकास कक्षाच्या प्रमुख प्रा.डॉ. संगीता चित्रकोटी यांनी प्रभारी प्राचार्य डॉ. अनिल बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दिलीप पाटील यांनी, तर आभार प्रा. महेश बिऱ्हाडे यांनी व्यक्त केले.

## माथेरानची राणी बाराही महिने धावणार?

पावसाळ्यात माथेरान या ठिकाणी येणाऱ्या पर्यटकांची संख्या हजारोंमध्ये आहे. त्यामुळे पावसाळ्यात मिनीट्रेनची माथेरान-अमन लॉज शटल सेवेलादेखील पर्यटक प्रवाशांचा मोठा प्रतिसाद मिळत असतो. ते लक्षात घेऊन पावसाळ्यात माथेरान डोंगरात कोसळणारे पाणी मिनीट्रेनचे नॅरोगेज मार्गाला कोणताही धोका न पोहोचवता खाली दरीमध्ये कसे जाईल यासाठी गेली दोन वर्षे मध्य रेल्वेकडून नियोजन केले जात आहे. त्याच माध्यमातून मिनीट्रेनच्या मार्गावर नॅरोगेज ट्रॅकच्या दोन्ही बाजूला पाणी वाहून जाणारी गटारे तयार करण्यात आली आहेत. सिमेंटची गात्रे बांधली गेल्याने पाणी सरळ वाहत जाऊन थेट दरीपर्यंत जात आहे. तर, डोंगरात अनेक ठिकाणी मोठे धबधबे असून, त्या ठिकाण एकावेळी भरपूर पावसामुळे मोठ्या प्रमाणात पाणी आल्यास नॅरोगेज मार्गाला धोका निर्माण झाला आहे. ते लक्षात घेऊन मध्यरेल्वे कडून पाणी वाहून नेण्यासाठी टाकण्यात आलेले लहान पाईप काढून टाकण्यात आले असून, तेथे आता सिमेंट पूल बांधले आहेत. त्यामुळे यावर्षी कुठेही भरपूर पाऊस होऊनदेखील नेरळ-माथेरान-नेरळ मार्गावर कुठेही नॅरोगेज मार्ग वाहून गेलेला नाही.

हे सर्व काम सुमारे ५ कोटी रुपये खर्चून करण्यात येणार असून, निविदांद्वारे कंत्राटदाराची नियुक्ती झाल्यानंतर ते पूर्ण होण्यासाठी १२ महिन्यांचा कालावधी लागणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. रुळांवर साचलेली माती काढण्यासाठी अभियंते सध्या जेसीबी मशीन वापरत आहेत. गेल्या काही वर्षांत मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी भिंतींना कुंपण घालणे, लाकडी स्लीपरच्या जागी काँक्रिट टाकणे आणि ट्रॅक मजबूत करणे यासह विविध कामे केली आहेत. या पावसाळ्याच्या सुरुवातीला, मध्य रेल्वेने सुरक्षेच्या कारणास्तव नेरळ-अमन लॉज सेक्शनवरील प्रवासी सेवा ८ जून ते १५ ऑक्टोबर या कालावधीत स्थगित केली होती. मात्र, पुढील वर्षांपासून बाराही महिने मिनीट्रेन सुरु ठेवण्यावर मध्य रेल्वेकडून विचार सुरु आहेत. डोंगरातील पाणी वाहून नेण्यासाठी असे १९ पूल ओळखले जात आहेत, तेथे सिमेंट काँक्रिटच्या बॉक्सने छोटे पाईप्स बदलले गेले आहेत, तर नॅरोगेज मार्गावर दरीकडील बाजूस यापूर्वीच अँटी क्रॅश बॅरिअर्स बसवण्यात आले आहेत.

## गणरायाचे आगमन

दहा दिवसांच्या बाप्पाच्या निरोपानंतर साखर चौथच्या गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना केली जाते, असे काही मंडळींकडून सांगण्यात आले आहे. ही परंपरा आजही कायम आहे. यावर्षीदेखील साखर चौथच्या गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली. शुक्रवारी सकाळपासून बाप्पाच्या आगमनाची तयारी सुरु होती. काहींनी मिरवणूक काढत वाजत गाजत बाप्पाचे स्वागत केले. तर, काहींनी पारंपरिक पद्धतीने डोक्यावर आणत बाप्पाचे स्वागत केले. एक वेगळा उत्साह आबालवृद्धांमध्ये दिसून आला. 'गणपती बाप्पा मोरया.. मंगलमूर्ती मोरया' असा जयघोष सर्वत्र दिसून आला. दुपारपर्यंत विधीवत पूजा झाल्यावर मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली. त्यानंतर बाप्पाच्या आवडीचे मोदक नैवेद दाखवण्यात आले. संध्याकाळी काही ठिकाणी संगीत खुर्ची, बाल्या नृत्यांचे सादरीकरण करण्यात आले. रविवारी सायंकाळी बाप्पाला निरोप दिला जाणार आहे. तलाव, समुद्र, नदीमध्ये गणरायाचे विसर्जन होणार आहे.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुकडी व जिल्हा रायगड, जिल्हा निबंधक रायगड, दुय्यम निबंधक अलिबाग, पोट तुकडी व तालुका अलिबाग, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती अलिबागमधील ग्रुपग्रामपंचायत मापगांवचे हद्दीतील मौजे बेलवली, गट नं. ३११ व ३१८/१ या वर्णनाच्या जमिन मिळकती यापुढे एकत्रितपणे ''सदर मिळकत'' म्हणून संबोधण्यात आलेल्या मिळकतींचे मालक व भोगवटादार **लिलेश किसन म्हात्रे** यांनी ''सदर मिळकती'' संदर्भातील खाली दिलेल्या अनुसूचित नमूद केलेल्या यादीतील मुळ दस्तऐवज हे एकतर हरवले आहेत किंवा गहाळ झालेले आहेत व त्यांचा शोध लागत नाही, असे प्रतिपादन आमचेकडे केलेले आहे. सदर मिळकतींचे एकमेव मालक म्हणून **लिलेश किसन म्हात्रे** यांनी अशी खात्री दिली आहे की, त्यापैकी कोणतेही मुळ दस्तऐवज त्यांनी कोणत्याही व्यक्तीकडे/व्यक्तींकडे किंवा आस्थापनेकडे ''सदर मिळकत'' जामीन अथवा तारण ठेवण्याच्या उद्देशाने जमा केलेले नाहीत.

तरी ज्या कुणा व्यक्तीचा/व्यक्तींचा, व्यक्तीसमुहांचा अथवा इतर आस्थापनांचा सदर मिळकतीमध्ये अथवा त्यातील कोणत्याही भागावर गहाण, विक्री, बक्षिस, दान, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, बेचनपत्र (असाईनमेंट), अदलाबदल, लिएन, बोजा, विश्वस्त, पोटगी, अन्न-वस्त्राचा हक्क, जप्ती, तारण, कर्ज, हातउसनवारी या अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असेल आणि/किंवा अशा हक्कांमुळे किंवा अन्य कारणास्तव सदर मिळकतींसंदर्भातील मुळ दस्तऐवज त्यांचे ताब्यात असतील तर त्यांनी सदरची बाब या नोटीसीच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसात ज्या दस्तऐवजांच्या आधारे ते असा हक्क सांगू इच्छित आहेत त्या संबंधीत मुळ दस्तऐवजांच्या प्रतींसह खाली नमूद केलेल्या आमच्या पत्त्यावर लेखी कळवावे, मुदतीत कुणाकडूनही तसे कळविण्यात न आल्यास कुणाच्याही ताब्यात सदरचे मुळ दस्तऐवज नाहीत व सदर मिळकतीवर कुणाचाही, कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे, असे गृहित धरण्यात येईल.

**अनुसूची**
**(मुळ दस्तऐवजाची यादी)**

१) श्रीमती. मंदाकिनी राजाराम नाफडे व श्री. लिलेश किसन म्हात्रे यांचेमध्ये स्वाक्षरीत झालेले दिनांक ४/११/१९८७ रोजीचे व दुय्यम निबंधक अलिबाग यांचे कार्यालयात दस्त क्र.९९४/१९८७ कडे नोंदविण्यात आलेले मौजे बेलवली स. नं. ११६/६ (गट नं. ३१६) व ११४/२९ (गट नं. ३११) या मिळकतीविषयीचे खरेदीखत.

२) श्री. गिरीश विष्णू गोडसे, वगैरे व श्री. लिलेश किसन म्हात्रे यांचेमध्ये स्वाक्षरीत झालेले दिनांक २९/९/१९९४ रोजीचे व दुय्यम निबंधक अलिबाग यांचे कार्यालयात दस्त क्र. ३१८/१९९४ कडे नोंदविण्यात आलेले मौजे बेलवली स. नं. ११७/२ गट नं. ३१८/१ या मिळकतीविषयीचे खरेदीखत.

अलिबाग
तारीख : २२/९/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुकडी व जिल्हा रायगड, जिल्हा निबंधक रायगड, दुय्यम निबंधक अलिबाग, पोट तुकडी व तालुका अलिबाग, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती अलिबागमधील ग्रुपग्रामपंचायत मापगांवचे हद्दीतील मौजे बेलवली, गट नं. ३०३, ३१०, ३१२, ३१३, ३१५, ३१८/२ व ३१९ या वर्णनाच्या जमिन मिळकती यापुढे एकत्रितपणे ''सदर मिळकत'' म्हणून संबोधण्यात आलेल्या मिळकतींचे मालक व भोगवटादार **वर्षा मनोहर पाटील व कोमल मनोहर पाटील** यांनी ''सदर मिळकती'' संदर्भातील खाली दिलेल्या अनुसूचित नमूद केलेल्या यादीतील मुळ दस्तऐवज हे एकतर हरवले आहेत किंवा गहाळ झालेले आहेत व त्यांचा शोध लागत नाही, असे प्रतिपादन आमचेकडे केलेले आहे. सदर मिळकतींचे एकमेव मालक म्हणून **वर्षा मनोहर पाटील व कोमल मनोहर पाटील** यांनी अशी खात्री दिली आहे की, त्यापैकी कोणतेही मुळ दस्तऐवज त्यांनी कोणत्याही व्यक्तीकडे/व्यक्तींकडे किंवा आस्थापनेकडे ''सदर मिळकत'' जामीन अथवा तारण ठेवण्याच्या उद्देशाने जमा केलेले नाहीत.

तरी ज्या कुणा व्यक्तीचा/व्यक्तींचा, व्यक्तीसमुहांचा अथवा इतर आस्थापनांचा सदर मिळकतीमध्ये अथवा त्यातील कोणत्याही भागावर गहाण, विक्री, बक्षिस, दान, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, बेचनपत्र (असाईनमेंट), अदलाबदल, लिएन, बोजा, विश्वस्त, पोटगी, अन्न-वस्त्राचा हक्क, जप्ती, तारण, कर्ज, हातउसनवारी या अथवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असेल आणि/किंवा अशा हक्कांमुळे किंवा अन्य कारणास्तव सदर मिळकतींसंदर्भातील मुळ दस्तऐवज त्यांचे ताब्यात असतील तर त्यांनी सदरची बाब या नोटीसीच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसात ज्या दस्तऐवजांच्या आधारे ते असा हक्क सांगू इच्छित आहेत त्या संबंधीत मुळ दस्तऐवजांच्या प्रतींसह खाली नमूद केलेल्या आमच्या पत्त्यावर लेखी कळवावे, मुदतीत कुणाकडूनही तसे कळविण्यात न आल्यास कुणाच्याही ताब्यात सदरचे मुळ दस्तऐवज नाहीत व सदर मिळकतीवर कुणाचाही, कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे, असे गृहित धरण्यात येईल.

**अनुसूची**
**(मुळ दस्तऐवजाची यादी)**

१) श्रीमती. मिना मोरेश्वर घाणेकर व श्री. मनोहर दत्तात्रेय पाटील यांचेमध्ये स्वाक्षरीत झालेले दिनांक ५/२/१९८८ रोजीचे व दुय्यम निबंधक अलिबाग यांचे कार्यालयात दस्त क्र. १३७/१९८८ कडे नोंदविण्यात आलेले मौजे बेलवली स. नं. ११४/३० व ११०/१ म्हणजेच गट नं. ३१० या मिळकतीविषयीचे खरेदीखत.

२) श्री. विश्वनाथ गजानन चांदोरकर व श्री. मनोहर दत्तात्रेय पाटील यांचेमध्ये स्वाक्षरीत झालेले दिनांक २३/३/१९८८ रोजीचे व दुय्यम निबंधक अलिबाग यांचे कार्यालयात दस्त क्र. ३७१/१९८८ कडे नोंदविण्यात आलेले मौजे बेलवली स. नं. ११६/३ म्हणजेच गट नं. ३१२ या मिळकतीविषयीचे खरेदीखत.

३) श्री. महादेव गजानन घरत व श्री. मनोहर दत्तात्रेय पाटील यांचेमध्ये स्वाक्षरीत झालेले दिनांक २५/३/१९८८ रोजीचे व दुय्यम निबंधक अलिबाग यांचे कार्यालयात दस्त क्र. ३८१/१९८८ कडे नोंदविण्यात आलेले मौजे बेलवली स. नं. ११६/२/२ म्हणजेच गट नं. ३१३ या मिळकतीविषयीचे खरेदीखत.

४) श्री. वासुदेव श्रीधर वैशंपायन व श्री. मनोहर दत्तात्रेय पाटील यांचेमध्ये स्वाक्षरीत झालेले दिनांक ६/१/१९८९ रोजीचे व दुय्यम निबंधक अलिबाग यांचे कार्यालयात दस्त क्र. २५/१९८९ कडे नोंदविण्यात आलेले मौजे बेलवली स. नं. ११६/१ म्हणजेच गट नं. ३१९ या मिळकतीविषयीचे खरेदीखत.

५) श्री. विष्णू गोडसे व श्री. मनोहर दत्तात्रेय पाटील यांचेमध्ये स्वाक्षरीत झालेले सन १९९० साली झालेले व दुय्यम निबंधक अलिबाग यांचे कार्यालयात नोंदविण्यात आलेले मौजे बेलवली स.नं.११६/२/१ (गट नं.३१८/२) या मिळकतीविषयीचे खरेदीखत.

अलिबाग
तारीख : २२/९/२०२४

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील.**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

मौजे-गाण तर्फे परहुर, ता. अलिबाग, जि. रायगड, सर्व्हे नं. ९/१, एकुण क्षेत्र १-१२-०० हे. आर., आकार १.७५ रुपै. पैकी मिळकत एकुण क्षेत्र ०-५०-०० हे.आर., आकार ०.७८ रू. पैसे ही मिळकत, सदरहू मिळकतीचे मालक श्री. सुधीर हिराजी थळे रा. मु. मोठे शहापुर, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून सदरहू मिळकत आमच्या अशीलांनी सर्व हक्कांगासह खरेदी करण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : २१/०९/२०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता - श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,
ए विंग, रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर,
ब्राम्हण आळी, अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

### शिक्षक पाहिजेत

एज्युकेशन सोसायटी, लोअर तुडील ता. महाड, जि रायगड या अल्पसंख्यांक संस्थेच्या एच.के.देशमुख व पी.खतीब हायस्कूल व ज्यु. कॉलेज, लोअर तुडील ता. महाड या कनिष्ठ महाविद्यालयामध्ये २०% अंशतः अनुदानित तत्त्वावर खालीलप्रमाणे शिक्षकांची आवश्यकता आहे.

| अ.क्र. | शै. अर्हता | विषय | संख्या |
|---|---|---|---|
| १ | M.Sc. - B.Ed | Chemistry | ०१ (पुर्णवेळ ) |
| २. | M.Sc - B.Ed | Maths | ०१ (पुर्णवेळ ) |
| ३. | M.Sc - B.Ed | Physics | ०१ (पुर्णवेळ ) |
| ४. | M. A - B.Ed | English | ०१ (पुर्णवेळ ) |
| ५. | M.Com - B.Ed | B.K + Economics | ०१ (पुर्णवेळ ) |
| ६. | M.Com - B.Ed | O.C+S.P | ०१ (पुर्णवेळ) |

तरी इच्छुक उमेदवाराने आपले अर्ज मूळ कागदपत्रांच्या छायांकित प्रतिसह बुधवार दि. २६.०९.२०२४ रोजी ठिक ११.०० वा. खालील पत्त्यावर उपस्थित राहावे.

पत्ता
**सचिव**
**एज्युकेशन सोसायटी. लोअर तडील**
मु.पो.लोअर तुडील, ता.महाड, जि.रायगड, पिन : ४०२११५
मो.-९४२२४९४९७५/८८८८३१६०१४
E-Mail Id : educationsocietylowertudil@gmail.com

### जाहिर नोटीस

तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यांस येते की तलाठी सजा जोहे हद्दीतील मौजे कोपर, ता.पेण, जि.रायगड येथील खालील वर्णनाची माझे अशिल यांनी त्यांचे नमुद विद्यमान मालक पद्मिनी हासुराम पाटील यांच्याकडून रजिस्टर खरेदी खतान्वये विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याचे वर्णन खालील प्रमाणे

| गाव | सर्व्हे नं./गट नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर. | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| कोपर | ७१/२ | ०.३६.००<br>पो.ख. ०.००.००<br>एकुण क्षेत्र ०.३६.०० | ५.६३ |

वरील संपुर्ण क्षेत्रापैकी ०.१६.०० हे.आर.इतके क्षेत्र आमचे अशिल हे नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी करीत आहेत.

तरी वर नमुद मिळकतीवर व मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लिन, चार्ज, ताबा, वहिवाट, साठेकरार, फरोक्त, इजमेंट बोजा अथवा कोणत्याही स्वरूपाचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ (पंधरा) दिवसाचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथम दर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत द्यावी वरिल मुदतीत कोणाचीही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडुन दिला आहे असे समजुन सदरील मिळकती निर्वेध व बोजारहित आहेत असे समजून आमचे आशिल सदर मिळकतीमध्ये खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करतील. मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

टिपः सदर नोटीस ही खरेदीखत लिहून घेणार यांच्या सांगण्यावरून देण्यात येत आहे.

ठिकाण: पेण
दि.२२/०९/२०२४

सही /-
**ॲड हेमा ज. पाटील (घोडिंदे)**
साई श्रध्दा सबुरी बिल्डिंग बी-विंग,
ब्लॉक नं. ००२, प्रभु आळी, पेण


## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

■ वरसोली, रायगड आदर्श नगर येथे ४.५ गुंठेचे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ₹.५५ लाख प्रत्येकी, एकत्रित ४.४ कोटी संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९

■ किहीम, रायगड समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटरचा NA प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत ₹.९० लाख बंगल्यासाठी योग्य - ९८२२२५७९२९

■ चौल, रायगड मुख्य रस्त्यावर, मुखरी गणपतीजवळ १८ गुंठे बागायत आणि ५५ गुंठे शेती (७३ गुंठे) जमीन एकत्रित विकणे आहे. अपेक्षित किंमत रुपये ७ कोटी - ९८२२२५७९२९

■ घरात घरकाम व मुलाची देखभाल करण्यासाठी केअर टेकर पाहिजे आहे. ठिकाण नागाव. कामाची वेळ सकाळी ९ ते संध्याकाळी ६ , पगार १००००. संपर्क- ७८७५८६६५५५.

■ घरकाम व मुलांना सांभाळणेसाठी बाई हवी आहे. ठिकाण : पंतनगर अलिबाग येथे पूर्णवेळ राहणारी किंवा सकाळी ७-३०/८ ते ५ संपर्क :९८६७२१५४९५/९४२२३७५१२४

■ सर्वप्रकारचे आजार, संतानप्राप्ती आर्युवैदिक निसर्गोपचाराने/विवाहनोंदणी/कर्ज/ठेवींवर लाखास दरमहा ३०००/- घरबसल्या कामासाठी डॉ.नथुराम शिहू/रायगड ४०२१०६ (पोयनाड-नागोठणा) ७०२००८५२०९

■ रिसॉर्ट वर कामासाठी जोडपं पाहिजे आहे. संपर्क- ९६०७१०२३५७, ठिकाण- सासवणे.

■ अलिबागमधील नामांकीत मोटार ट्रेनिंग स्कुलसाठी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क : 9823492626/7998619191

■ LIC Office विजयनगर वरसोली येथे ऑफीस कामासाठी मुलगी पाहिजे. संपर्क :७५०७९२९१२८/९४२२४९४५९०

■ अलिबाग-मुंबई हायवेवर पिंपळभाट येथे ३००० स्क्वे. फूट, हॉल/जागा ऑफिससाठी भाड्याने देणे आहे. गरजूंनी अथवा इच्छुक एजंटने संपर्क करावा. संपर्क- ९२२६३७९८४४/९८२३९२७२८८

■ शुभमुहूर्त विवाह मंडळ अलिबाग शाखेत सर्व जातीय वधूवरांची नावनोंदणी ५० शाखा वेबसाईट संपर्क : ९९२६७६६१२९

■ जन्मकुंडली, हस्तरेषा, टॅरोकार्ड, अंकशास्त्र, वास्तूशास्त्र, रत्नशास्त्र, वेलनेस ज्योतिषालय, ९२२६७६६१२९

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१



### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

-मुख्य संपादक


### ग्रुप ग्रामपंचायत वळके

जा.क्र. ग्रा.पं. १२०३/२०२४ — दिनांक:-२०/०९/२०२४

**साहित्य दरपत्रक मागणी निविदा**

ग्रुप ग्रामपंचायत वळके कार्यालयामार्फत खालील दर्शविलेल्या साहित्य खरेदी बाबत महाराष्ट्र शासन निर्णय व रा.जि.प. यांजकडील नोंदणीकृत स्थानिक पुरवठादार/दुकानदारांकडून खालील कामांच्या मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | निधी स्तर | अंदा. दर |
|---|---|---|---|
| १ | मेडिक्लोर खरेदी करणे | १५ वा वित्त आयोग | ९०००० /- |
| २ | टि.सी. एल खरेदी करणे. | १५ वा वित्त आयोग | ५००००/- |
| ३ | चुना पावडर खरेदी करणे. | १५ वा वित्त आयोग | ५४२५०/- |
| ४ | किशोर वयीन मुलींना सॅनिटरी पॅड खरेदी करणे | १५ वा वित्त आयोग | ९९००० |
| ५ | कचराकुंडया खरेदी करणे. | १५ वा वित्त आयोग | २५००००/- |
| ६ | ग्रा.प. हद्दीतील सर्व रा.जि.प शाळा येथे सौर पथदिवे बसविणे. | १५ वा वित्त आयोग | ९११००/- |
| ७ | ग्रा.प.हद्दीतील सर्व अंगणवाड्यांना साहीत्य खरेदी करणे. | १५ वा वित्त आयोग | ७२४४०/- |
| ८ | ताडगांव आदिवाशी येथे बोरिंगला हातपंप बसविणे. | १५ वा वित्त आयोग | २८९७६/- |

**टिपः-**

१) दिनांकः -२५/०९/२०२४ पर्यंत कार्यालयीन वेळेत दरपत्रक सादर कराव्या उशिरा आलेल्या दरपत्रक/अर्ज स्विकाराल्या जाणार नाही. सदर दरपत्रकबाबत मंजुरीनुसार परस्पर नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करण्यात येईल.
२) पुरवठादार/दुकानदार जी.एस.टी धारक नोंदणीकृत असावेत.
३) ग्रामपंचायत वळकेकडे उपलब्ध निधी नुसारच बिल देण्याची कार्यवाही करण्यात येईल.
४) १ किंवा सर्व दरपत्रकअर्ज फेटालण्याचे सर्व अधिकार तसेच दरपत्रकमंजुरीचा सर्व अधिकार सरपंच ग्रामपंचायत वळके यांसकडे ठेवण्यात येत आहे.

सही/-
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपचायत. वळके**
**ता. मुरुड-जंजिरा जि राजगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपचायत. वळके**
**ता. मुरुड-जंजिरा जि राजगड**

### ग्रुप ग्रामपंचायत वळके

जा.क्र. ग्रा.पं. १२०३ /२०२४ — दिनांक :- २०/०१/२०२४

**अल्प मुदतीची निविदा सुचना**

ग्रुप ग्रामपंचायत वळकेने १५ वा वित्त आयोग सन २०२३/२०२४ व २०२४/२०२५ योजनेअंतर्गत खालील प्रमाणे कामांसाठी सीलबंद निविदा मागविण्याचे ठरविले आहे. तरी अधिकृत ठेकेदारांनी दि. २५/०९/२०२४ रोजी संध्या ठीक ५.०० वाजेपर्यंत निविदा पाठवाव्यात. आलेल्या निविदा दि. २६/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता उघडण्यात येतील, त्यावेळी उपस्थित रहावे. निविदा फार्म दि.२५/०९/२०२४ रोजी संध्या ठीक ५.०० वाजेपर्यंत दिले जातील, त्यानंतर उशिरा आलेल्यांना दिले जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम | सुरक्षा अनामत | निविदा किंमत रक्कम | निविदा पाठविण्याची अंतिम तारीख | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिरगांव तलाव सुशोभिकरण करणे (सन २०२३/२४) | १५ वा वित्त आयोग | १७३७००/- | १७३७/- | | १००/- | २५/०९/२०२४- संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| २ | शिरगांव येथिल नथुराम विठ्ठल काजारे यांच्या बेडयालगत गटाराला संरक्षण भिंत बांधणे. (सन २०२३/२४) | १५ वा वित्त आयोग | १९३७००/- | १९३७/- | | १००/- | २५/०९/२०२४- संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ३ | शिरगांव विहिर दुरुस्ती करणे. (सन २०२४/२५) | १५ वा वित्त आयोग | ७००००/- | ७००/- | | १००/- | २५/०९/२०२४- संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ४ | वळके आदिवाशीवाडी नळ पाईप लाईन बसविणे. (सन २०२४/२५) | १५ वा वित्त आयोग | ७००००/- | ७००/- | | १००/- | २५/०९/२०२४- संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ५ | सातिडे विहिर दुरुस्ती करणे, (सन २०२४/२५) | १५ वा वित्त आयोग | ७००००/- | ७००/- | | १००/- | २५/०९/२०२४- संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ६ | ताडगांव विहीर व शेड दुरुस्ती करणे. (सन २०२४/२५) | १५ वा वित्त आयोग | ७००००/- | ७००/- | | १००/- | २५/०९/२०२४- संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ७ | अमृत सरोवर तलाव साफसफाई करणे. (सन २०२४/२५) | १५ वा वित्त आयोग | ७३६७०/- | ७३७/- | | १००/- | २५/०९/२०२४- संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ८ | ताडवाडी विहिर जवळ शेड बांधणें. (सन २०२४/२५) | १५ वा वित्त आयोग | ९००००/- | ९००/- | | १००/- | २५/०९/२०२४- संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ९ | शिरगांव येथे नितिन सातामकर याच्या घराजवळील गटार साकाव दुरुस्ती करणे. (सन २०२४/२५) | १५ वा वित्त आयोग | ५००००/- | ५००/- | | १००/- | २५/०९/२०२४- संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| १० | प्राथमिक केंद्र शाळा वळके दुरुस्ती व रेन वॉटर हारवेस्टिंग बसविणे. (सन २०२४/२५) | १५ वा वित्त आयोग | ९००००/- | ९००/- | | १००/- | २५/०९/२०२४- संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| ११ | येस स्मशानभूमी येथे माती भराव करणे. (सन २०२४/२५) | १५ वा वित्त आयोग | ५००००/- | ५००/- | | १००/- | २५/०९/२०२४- संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |
| १२ | ग्रामपंचायत कार्यालय बांधकाम करणे. (सन २०२४/२५) | १५ वा वित्त आयोग | ३१९४४४/- | ३१९४/- | | १००/- | २५/०९/२०२४- संध्या ५ वाजेपर्यंत | ३ महिने |

**अटी व शर्ती-**

१) १ टक्के इसारा रक्कम अंदाजपत्रकीय रक्कमेच्या कार्यारंभ आदेश देण्यापुर्वी भरावी लागेल व उर्वरीत रक्कम देयकातून कपात केली जाईल.
२) कोरे निविदा फॉर्म फी रू. १००/- इतकी राहिल.
३) कामाचे अंदाजपत्रक व आराखडे कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील आवश्यक असल्यास फी भरून त्याची प्रत उपलब्ध केली जाईल.
४) प्राप्त निविदा दि. २६/०९/२०२४ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात वळके येथे उपस्थितांचे समक्ष मा. सरपंच यांचे हस्ते उघडणेत येईल.
५) निविदा भरणाऱ्या ठेकेदाराने आपले रजिस्टेशनचे दाखले हे सत्यप्रत केलेले असावेत व सोबत चालू आर्थिक वर्षात केलेले कामाचा समक्ष प्राधिकाऱ्यांचा दाखला असावा. प्रथम प्राधान्य नोंदणीकृत ठेकेदारांस दिला जाईल.
६) कोणतीही १ अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच वळके यांनी राखून ठेवला आहे.
७) प्रत्येक देयकातून शासन नियमाप्रमाणे रक्कम कपात केल्या जातील. मा. शाखा अभियंता साहेब बांधकाम पं.स.मुरूड यांचेकडील तांत्रिक अधिकारी व ग्रामपंचायतीचे पदाधिकारी/सदस्य यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून काम समाधानकारक नसेल तर ते त्याच स्थितीत थांबवून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
८) काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्यानंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
९) जी. एस. टी नंबर आवश्यक आहे.
१०) पॅन कार्ड नंबर आवश्यक आहे.

सही/-
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपचायत. वळके**
**ता.मुरुड-जंजिरा जि. रायगड**

सही/-
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपचायत. वळके**
**ता. मुरुड-जंजिरा जि. रायगड**

# एकदरा पुलाचे काम अपूर्णावस्थेत

## नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण



**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

**मुरुडला जोडणारा महत्त्वाचा असणारा एकदरा पुलाच्या दुरुस्तीचे काम अपूर्ण अवस्थेत असल्याने नागरिक संभ्रमात असून, चिंताग्रस्त झाले आहेत.**

एकदरा पूल ६२ वर्षांपासून दुरुस्ती न झाल्याने या पुलावरचे सुरक्षित कठडे व बेअरिंग पूर्णतः खराब झाल्याने हा पूल धोकादायक बनला होता. या पुलावरून एकदरा, माझेरी, राजपुरी, खोरा, डोंगरी या गावातील सर्व ग्रामस्थ रोजच्या रोज मुरुड शहराकडे रोज ये-जा करीत असतात. पुलाची दुरुस्ती होत नसल्याने ग्रामस्थांसह पर्यटकांनी नाराजी दर्शवली होती.

याची दखल सार्वजनिक बांधकाम विभागाने घेऊन या पुलाच्या दुरुस्तीकरिता चार कोटी रुपये मंजूर करुन हे काम ठाणे येथील संरचना या कंपनीला देण्यात आले होते. या कामाला २० जानेवारी २०२३ पासून सुरुवात झाली होती. पुलाच्या खालचे काम प्रगतीपथावर होते. परंतु, पुलाचे कठडे जसेजसे दिसून येत आहेत, हे कठडे धोकादायक असून, एकदा मोटारसायकलस्वाराने साधारण धडक दिली तरी कठडे तुटून या ठिकाणी मोठा अपघात होऊ शकतो. त्यात हे काम बरेच दिवस काम बंद असल्याने ग्रामस्थ संभ्रमात पडले आहेत. याच पुलाखाली कोळी मच्छिमार बांधव आपल्या बोटीची दोरखंड टाकून बोटी नांगर टाकून उभ्या करत असतात. कठड्याचे काम व पुलाचे काम पुन्हा लवकरात लवकर सुरू करावे, अशी मागणी सर्वच स्थरावर होत आहे.

> झालेल्या कामाचे बिल थकीत असल्याने काम बंद ठेवण्यात आले आहे. पुलाच्या बेअरिंग बसवणं बाकी आहे. बेअरिंग बसवण्यासाठी प्रोलची मागणी केली आहे. मागणी मान्य झाली का पूल उचलून बेअरिंग बसवण्याच्या कामाला सुरुवात होईल. त्याआधी झालेल्या कामाचे बिल मिळणे आवश्यक आहे. कठडे बसविण्याचे काम माझ्याकडे नाही आहे. यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाशी संपर्क साधा.
>
> – प्रशांत कांबळे, अभियंता, संरचना कंपनी

> एकदरा पुलाच्या झालेल्या कामाचे बिल ठेकेदारांनी जमा केले आहे. निधी जमा न झाल्याने मार्च महिन्यापासून सर्वांची बिले बाकी आहेत. निधी जमा झाला की बिले काढण्यात येतील. १९६२ पूर्वीचा पूल आहे. बेअरिंगचे काम करतेवेळी व्यवस्थित केलं जाईल. इंजिनिअरकडून वरच्या लेवला प्रोलची मागणी केली आहे. पुलाच्या कठड्यांच्या कामासाठी शासनाकडून निधी मंजूर झालेला नाही. निधी मिळावा त्यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत.
>
> – सूरज अनुसे, सहाय्यक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग

# पवार गटाकडून घोंगडी बैठका सुरु



**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्रात येऊ घातलेल्या विधानसभेच्या निवडणूक व पक्षाचा प्रचार यासाठी शरद पवार यांच्या पक्षाने घोंगडी बैठकीच्या माध्यमातून लोकसंपर्क, विचारांची देवाणघेवाण असा अभिनव उपक्रम हाती घेतला असून, त्याला चांगली लोकप्रियता व मोठा सहभाग मिळत आहे. ग्रामीण भागातून पहिला टप्पा सुरु झाला असून, दुसरा टप्पा थेट नवी मुंबईतून सुरु झाला आहे. यास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असल्याचे बेलापूर विधानसभा संयोजक डॉ. मंगेश आमले यांनी सांगितले.

या घोंगडी बैठक उपक्रमाची माहिती देण्यासाठी सानपाडा येथील राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालयात एका पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना डॉ. मंगेश आमले यांनी सांगितले की, संविधान वाचविणे व त्या अनुषंगातून विविध समस्या सोडविणे, जनतेला, मतदारांना त्यांच्या मूलभूत सुविधा मिळवून देणे हा मुख्य उद्देश घेऊन घोंगडी बैठक सुरु झाली. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश महासचिव रमेश जाधव, प्रवक्ते प्रकाश चव्हाण, माजी नगरसेविका संगीताताई बोराडे आदि उपस्थित होते. ग्रामीण भागात २० तालुक्यात पहिल्या टप्प्यात २७ ऑगस्ट ते २ सप्टेंबरदरम्यान बैठका घेत नागरिकांशी संवाद साधण्यात येत आहे.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२२ सप्टेंबर**

१) श्रीम. चारूशील शरद कोरडे श्रीबाग-२, दि.२२-९-१९५६
२)श्री.अचुत श्रीनिवास मळगी वेश्वी अलिबाग, दि.२२-९-१९५६


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै. चंद्रशेखर जगन्नाथ सरमळकर, स्मरणार्थ, बोरीवली**



**कै. दत्ताराम दशरथ पाटील स्मरणार्थ अलिबाग**



**कै. कमलाकर माया म्हात्रे, ४थे वर्ष श्राद्ध, अलिबाग**

# चिरनेर तीर्थक्षेत्रात गणेशभक्त



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील चिरनेर महागणपती क्षेत्रात संकष्टी चतुर्थीनिमित्ताने शनिवारी गणेशभक्तांनी प्राचीन महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला. पहाटेपासूनच श्रींच्या दर्शनाला सुरुवात झाली होती. मात्र, यावेळी चिरनेर परिसरातील गावागावात साखर चौथीच्या गणपतीची प्रतिष्ठापना करण्यात आल्यामुळे, गणेश मंदिरात महागणपतीच्या दर्शनासाठी गणेशभक्तांची फारशी गर्दी दिसून आली नाही. चिरनेर येथील गणपती मंदिर हे हेमाडपंथीय धाटणीचे दिसून येते. हे गणपती देवस्थान अत्यंत जागृत असून, या ठिकाणी आलेल्या भक्तांची दुःखे निश्चित दूर होतात, अशी गणेशभक्तांची श्रद्धा आहे.

# प्लास्टिकमुक्त माथेरान केव्हा होणार?

## स्थानिकांसमोर यक्षप्रश्न

**। माथेरान । वार्ताहर ।**

माथेरानमध्ये बहुतेक ठिकाणी प्लास्टिकजन्य कचरा इतस्ततः विखुरलेल्या अवस्थेत दिसत असून, स्वच्छ माथेरान, हरित माथेरान, सुंदर माथेरान ही बिरुदावली हळूहळू लोप पावत चाललेली असल्याने या नयनरम्य पर्यटनस्थळाची प्रतिमा काही वर्षांपासून इथे वाढत चाललेल्या वस्तीमुळे त्याचप्रमाणे जिकडेतिकडे पॉईंट तसेच रस्त्याच्या बाजूला नजर जाईल तिकडे टपऱ्या बांधण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे प्लास्टिक पाण्याच्या बाटल्या तसेच रॅपर्स पाकीट जंगलात कुठेही टाकली जात आहेत. यामुळे या गावाच्या भविष्यातील पर्यटनाबाबत स्थानिकांना यक्षप्रश्न पडलेला दिसत आहे. अनेक ठिकाणी कचराकुंड्या नसल्याने जंगलात आणि नागरी वस्तीतसुद्धा मोठ्या प्रमाणावर कचऱ्याचे साम्राज्य पसरलेले दिसत आहे.




नगरपरिषदेच्या माध्यमातून घनकचरा व्यवस्थापन कामी दरवर्षी जवळपास एक करोड रुपयांपेक्षाही अधिक खर्च केला जात आहे. परंतु या व्यवस्थापन ठेकेदाराचे कामगार खरोखरच आत्मीयतेने आपल्या कामाला न्याय देतात का, हासुद्धा प्रश्न स्थानिकांना सतावतो आहे. प्लास्टिक जन्य कचऱ्यामुळे अनेक झाडे दगावत असून, याचा पर्यावरणाला धोका निर्माण झाला आहे. झाडी हळुहळु लोप पावत असल्याने इथला हवेतील गारवा पूर्णपणे संपुष्टात आल्याने याठिकाणी बाराही महिने पंखा लावल्याशिवाय राहणे कठीण बाब बनली आहे.इथल्या पर्यटन वाढीच्या विकासकामाला आडकाठी आणणाऱ्या पर्यावरणवाद्यांना या बाबी निदर्शनास येत नाहीत, परंतु भूमीपुत्रांच्या न्याय्य हक्कावर, त्यांच्या स्वातंत्र्यावर, मूलभूत सेवासुविधा तसेच अत्यावश्यक गरजेच्या सोयींवर गदा आणण्यासाठी मुंबई स्थित पर्यावरणवाद्यांनी डोळ्यावर पट्टी बांधली आहे का, असाही प्रश्न युवा वर्गातून उपस्थित केला जात आहे.

घनकचरा व्यवस्थापन ठेकेदाराचे कामगार नियोजित कामे पूर्ण करीत नसतील तर अशा ठेक्यासाठी करोडो रुपये नाहक खर्च का केला जात आहे. यापेक्षा येथील जे कुणी सुशिक्षित बेरोजगार युवक आहेत ज्यांना खरोखरच या गावाविषयी तळमळ आहे आपले गाव कायमस्वरूपी हरित सुंदर आणि स्वच्छ असावे ही मनोवृत्ती ज्या होतकरू युवकांमध्ये आहे अशांना हा ठेका सुपूर्द करण्यात यावा जेणेकरून नगरपरिषदेची आर्थिक बचत आणि हा सर्व पैसा गावात राहू शकतो, असेही स्थानिकांमधून बोलले जात आहे.

# साप्ताहिक राशिभविष्य दि. २२ ते २८ सप्टेंबर २०२४

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

## मेहनतीला यश मिळेल



**मेष :** या राशीसाठी हा आठवडा जर तुम्ही आपली मेहनत कायम ठेवली, तर तुम्हाला यश मिळवण्यात कुणी थांबवू शकणार नाही. मात्र, तुम्हाला हाच सल्ला आहे की, मेहनत करणे थांबऊ नका, दुसरे महत्वाचे म्हणजे उधार मागू नका आणि आपल्या गरजांवर प्रतिबंध आणा. कौटुंबिक जीवनाची गोष्ट केली असता या कालावधीत तुमचे घरातील ज्येष्ठ चिंतीत होऊ शकतात. अशा वेळेत तुम्हाला त्याच्याशी गप्पा करणे चांगले ठरेल, तसेच त्यांच्यासोबत वेळ व्यतीत केला पाहिजे आणि त्यांच्या समस्यांना जाणून प्रयत्न केला पाहिजे. या आठवड्यात तुम्हाला भाग्याची पूर्ण साथ मिळेल आणि भाग्याचा बळावर तुम्ही कुठल्या स्पर्धा परीक्षेत यश मिळवू शकतात. कलाकारांना चांगला सन्मान प्राप्त होणार आहे. नामांकन करण्यास हरकत नाही. **महिलांना :** रागापासून लांब राहा, त्यामुळे त्रास आपल्याला होऊ शकतो. शांत राहण्यात फायदा आहे. उधारी फेडण्यासाठी केलेली मेहनत वाया जाणार नाही. परिणाम, आपण ऋण मुक्त व्हाल. तोंडाच्या संबंधित काही समस्यांचा सामना लागू शकतो. काळजी घ्या. **शुभदिनांक-** २३,२४.

## आरोग्याकडे लक्ष द्या



**वृषभ :** या राशीसाठी हा आठवडा तुम्हाला जगामध्ये आपली वेगळी ओळख बनवण्यासाठी कठीण मेहनत करणारा ठरेल. विचार न करता मेहनत करा, हळूहळू त्यात आपल्याला यश आलेले दिसेल. या राशीतील जातकाचे प्रेम जीवन या महिन्यात प्रतिकूल राहू शकते. त्यामुळे प्रेमिकांनी काळजी घ्यावी. कोणाच्याही नजरेत येणार नाही असे वागा. या आठवड्यात या राशीतील जातकांच्या आर्थिक पक्षात नजर टाकली असता यात सुधारणा होण्याची पूर्ण शक्यता आहे. यावेळी धार्मिक कार्यात तुमचा खर्च वाढू शकतो. तथापि, यामुळे तुम्हाला जास्त फरक पडणार नाही. कारण एका बाजूने पैसा हातात येईल, याचे कारण आपण खूप जास्त वेळ काम करणार आहात. त्याचा मोबदला आपल्याला मिळेल. **महिलांना :** महत्त्वाची बाब म्हणजे, तुम्हाला आपल्या कामामध्ये काही वेळ काढून आराम नक्कीच केला पाहिजे. तरच तुमच आरोग्य चांगले राहू शकते. आपली मेहनत वाया जाणार नाही, त्याचा निकाल आपणास पुढे दिसेल. घरात वर्दळ वाढणार आहे. विवाहितांना चांगली बातमी मिळेल. **शुभ दिनांक-** २३,२५.

## मानसिक शांतता लाभेल



**मिथुन :** या राशीसाठी हा आठवडा तुम्हाला मानसिक शांती देणारा ठरणार आहे. या आठवड्यात तुम्ही आपल्या नातेवाईकांसोबत मिळून कुठल्या धार्मिक स्थळी सहल आयोजन करू शकतात. हे आयोजन तुम्हाला समाजात मान-सन्मान देईल. या राशीतील विद्यार्थ्यांसाठी हा आठवडा थोडा प्रतिकूल राहू शकतो. या कालावधीत तुम्हाला शिक्षणाच्या क्षेत्रात चांगले फळ मिळण्यासाठी कठीण मेहनत करण्याची आवश्यकता आहे. वाईट संगतीपासून या कलावधीत दूर राहा आणि जितके शक्य असेल एकांतात राहून अभ्यास करा. स्पर्धा परीक्षा सोपी जावी यासाठी अभ्यासाची वेळ बदला. या राशीतील विवाहित जातकाचे जीवनसाथी कालावधीत एका मित्रासारखे त्यांच्याशी व्यवहार करू शकतात. त्यामुळे घरातील वातावरण सुधारेल.

**महिलांना :** या राशीने आपल्या कामाबाबत चालढकल करू नये, नाहीतर होणारे कामही होणार नाही. त्यासाठी दिलेला वेळ व शब्द पाळावा, काम सोपे होऊन जाईल. कामात ताण घेऊ नये, ॲसिडिटीचा त्रास होऊ शकतो. त्यासाठी सकाळी कोमट पाणी घ्या.

**शुभदिनांक-** २४,२५

## नोकरीची संधी चालून येईल




**कर्क :** या आठवड्यात खूप मेहनत करावी लागेल. ज्यांना अद्याप नोकरी लागलेली नाही, त्यांना खास सूचना तुम्हाला या आठवड्यात मित्र आणि टीव्ही तसेच मोबाइलपासून दूर राहावे लागेल, तरच तुम्हाला आपल्या मनासारखी नोकरी मिळू शकते. या सप्ताहात तुम्हाला तुमची उधारी परत मिळू शकते. यामुळे तुमच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा होईल. अडकलेले पैसे वसूल करण्यास चांगला कलावधी आहे. कौटुंबिक जीवनात मोठ्या भाऊबहिणींचे पूर्ण सहयोग मिळेल. या आठवड्यात तुम्हाला घरातील लहान सदस्यांनाही वेळ दिला पाहिजे आणि त्यांच्यासोबत खेळून आणि त्यांना वेळ देऊन जवळीकता वाढवली पाहिजे. बुधवारी कमी बोलणे फायद्याचे राहील. त्या दिवशी कमी बोलणे अतिशय पैसा देणारे ठरू शकते. जर तुम्ही गुटका, तंबाखू जशा पदार्थांचे सेवन करत असाल तर, तुम्हाला या समस्यांचा सामना करावा लागू शकतो. अशा गोष्टींपासून दूर राहणेच तुमच्यासाठी उत्तम असेल.

**महिलांना :** आर्थिक लाभ आहे. कलाकारांचा सन्मान होणार आहे.

**शुभदिनांक-** २६,२७.

## आर्थिक आवक वाढेल




**सिंह :** प्रत्येक व्यक्तीला वाटते की, त्यांच्या करिअरचा ग्राफ लागोपाठ वर जात राहावा. तुमची इच्छाही अशीच आहे की, तुमच्या कमाईमध्ये वृद्धी व्हावी आणि तुमची नोकरी व्यवस्थित चालत राहो. या आठवड्यातही दोन्ही अनुभवाल, सोबत हातात पैसा खुळखुळणार आहे. बचत करण्यास चांगली वेळ आहे. तसेच या राशीतील आर्थिक परिस्थिती चांगली असणार आहे. या राशीसाठी या कालावधीत बऱ्याच वेळा तुमच्या चांगल्या कामाच्या कारणाने काही लोक तुमच्या कार्यक्षेत्रात तुमचे शत्रू बनू शकतात आणि तुमच्या पाठीमागे कारस्थान रचू शकतात म्हणून, कार्यक्षेत्रात खूप विचार करून चालण्याचा सल्ला दिला जातो आहे. कौटुंबिक जीवनात जमिनीच्या वाटणीला घेऊन तुम्ही घरातील वरिष्ठ लोक आणि आपल्या भाऊ बहिणींसोबत वाद करू शकतात. तुमच्यामुळे कुटुंबात तणाव स्थिती बनू शकते शांत राहून मार्ग काढणे हे उत्तम राहील, या राशीतील महिलाना हा कालावधी खूप चांगला राहण्याची स्थिती आहे तरीही आपल्या जीवनसाथीच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्याची आवश्यकता असेल. **शुभ दिनांक -** २२,२८

## व्यावसायिकांना उत्तम काळ



**कन्या :** या राशीसाठी चालू साप्ताह तुम्हाला आपल्या कार्यक्षेत्रात चांगले फळ देणारा ठरेल, तुम्ही शारीरिकदृष्ट्या बरेच फीट राहाल. कठीण परिश्रम आणि इमानदारीने तुम्ही या साप्ताहात आपल्या कार्यक्षेत्रात आपली नवीन ओळख बनवू शकतात. आपला ठसा उमटवू शकाल. तुमच्या कामाला पाहून तुमच्या बॉसद्वारे तुमच्या कमाईमध्ये वाढ केली जाऊ शकते तसेच व्यावसायिकांचा व्यवसाय ही चांगला चालेल. तुमच्या आर्थिक जीवनात चांगल्या फळांची प्राप्ती या सप्ताहात मिळेल. कौटुंबिक जीवनात तुम्ही नेहमी सुखशांतीमध्ये राहण्याची तुमची इच्छा असते. ह्या कालावधीत ती पूर्ण होऊ शकते. विद्यार्थी या कालावधीत चांगले अभ्यास करतील, निकालही यशाने भरलेला असेल. या राशीतील विद्यार्थ्यांसाठी सूचना आहे. या कालावधीत शिक्षणाच्या क्षेत्रात यश प्राप्त करण्याची इच्छा आहे, तर तुम्हाला आपल्या मित्रांपासून थोडी दुरी ठेवली पाहिजे. त्यामुळे निकालात फरक पडेल. **महिलांना-** या राशीतील जातकांना डोळे किंवा कानासंबंधित समस्या होऊ शकते. कुठल्याही प्रकारच्या आरोग्य समस्यांना दूर करण्यासाठी डॉक्टरांकडे जाणे योग्य असेल. **शुभ दिनांक -**२३,२६

## स्पर्धा परीक्षेत उत्तुंग यश




**तुळ :** या राशीसाठी या सप्ताहात घरातील लोकांमध्ये उत्तम सामंजस्य राहील. यासोबतच जीवनसाथीसोबत मिळून तुम्ही काही नवीन व्यवसाय या कालावधीत सुरु करू शकतात. या राशीतील काही विद्यार्थी यावेळी स्पर्धा परीक्षेत उत्तुंग यश मिळवू शकतात. प्रेम आणि वैवाहिक जीवन या कालावधीत दोन्ही क्षेत्रात उत्तम फळ प्राप्त होतील. तरी प्रेमात आपण कुठल्याही प्रकारचा गैरसमज करणे टाळले पाहिजे, नाहीतर नाते खराब होऊ शकते. आरोग्याबाबत या कालावधीत तुम्हाला थोडे सतर्क राहण्याची आवश्यकता आहे. जागरण टाळणे योग्य ठरेल. तुम्हाला डोळ्यांची तपासणी करावी लागेल. खरेदी-विक्रीबाबत काळजी घ्या. घरात कलशाची मांडणी करून पूजा करणे फायद्याचे ठरेल. **महिलांना-** आपल्या कामाईत वाढ होणार आहे. घरात शुभकार्य करण्याचे योग आहेत. अशावेळी ताण न घेता कार्य करा, तुमचे घरातील ज्येष्ठ चिंतीत होऊ शकतात. अशा वेळेत तुम्हाला त्याच्यासोबत वेळ व्यतीत केला पाहिजे आणि त्यांच्या समस्यांना जाणून प्रयत्न केला पाहिजे. **शुभ दिनांक -** २४,२५

## सकारात्मक परिवर्तन होईल



**वृश्चिक :** या सप्ताहात जर आपण नोकरी-धंदा शोधत असाल, तर कालावधीत त्यांना चांगल्या पगाराचे काम मिळू शकते. धंद्यातही चांगले प्रस्ताव येतील तसेच या राशीतील काही जातकांच्या घरातील कमाईमध्ये वाढ होण्याने तुमच्या आईवडिलांच्या आरोग्यातही सकारात्मक बदल होण्याची पूर्ण शक्यता आहे. यामुळे तुम्हाला प्रेम करतात त्यांच्या घरातून या कालावधीत तुम्हाला समर्थन मिळू शकते, म्हणजे काही गोष्टींना घेऊन ते तुमच्या जोडीदारापेक्षा तुमच्यावर विश्वास दाखवू शकते. तसेच, कंबरेच्या डाव्या बाजूला ही दुखणे असू शकते. नियमित एक ठरलेल्या वेळी महामृत्युंजय मंत्राचा १०८ वेळा जप करा. ही एक अग्नी तत्वाची राशी आहे म्हणून या राशीतील जातक दृढ इच्छाशक्तीचे मालक असतात. तुम्ही या साप्ताहात जीवनात सकारात्मक परिवर्तन आणू शकतात. करिअरच्या क्षेत्रात ज्या चांगल्या बदलाची तुम्ही अपेशा आहे ते बदल या कालावधीत येऊ शकतात या कारणाने घरातील बरेच खर्च तुम्ही सहजरित्या पूर्ण करू शकाल. **महिलाना-** या कालावधीत आपण बरीच राहिलेली कामे पूर्ण करू शकाल, सहलीचा बेत पूर्ण करू शकाल. **शुभ दिनांक -** २६,२७


## मनासारखी नोकरी मिळेल



**धनु :** या राशीसाठी राशीसाठी या आठवड्यात जे जातक बेरोजगार आहें जे चांगली नोकरी मिळवण्याचे स्वप्न पाहज्ञत असतील त्यांच्यासाठी चांगली बातमी येऊ शकते. या कालावधीत तुम्हाला आपल्या मनासारखी नोकरी मिळण्याची शक्यता वाढली आहे. तुमच्या कमाईमध्ये वृद्धी होऊ शकते. कमाईमध्ये वृद्धी होण्याने या कालवधीत तुमचे बरेच थांबलेले व्यवहार पूर्ण होतील. कौटुंबिक जीवनातही या कलावधीत तुम्हाला सुखद अनुभवाची प्राप्ती होईल. या कालावधीत विद्यार्थी शाळा कॉलेजच्या शिक्षणासोबत खेळात रुची घेऊ शकतात. त्याचप्रमाणे अल्पावधीचे काम तुम्ही सुरु करू शकतात. तुमची बुद्धिमत्ता या कालावधीत उत्तम राहील. आपली अडकलेली कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न यावेळी यशस्वी होऊ शकतो. प्रेमिकांना प्रेमात यश संभवते, तरीही कोणतीही जोखीम घेऊ नका.


**महिलांना-** तुम्हाला किडनी आणि पोट संबंधित काही समस्या असतील तर या कालवधीत सपूर्ण काळजी घेणे हितावह ठरेल. घरातीलचा जप करा. **शुभ दिनांक -** २४,२५

## कलागुणांना वाव मिळेल



**मकर :** या सप्ताहात कौटुंबिक जीवनातही सकारात्मक बदल घडतील, आपण लहान भावंडांसह चांगला वेळ घालवू शकता. जेव्हा आपल्या कुंडलीत वेगवेगळ्या ग्रहांचे संक्रमण असेल, तेव्हा आपण अत्यंत महत्त्वाकांक्षी असाल. जे लोक ॲथलेटिक्स किंवा खेळात भाग घेणार आहे, त्यांना या काळात भरपूर यश मिळू शकते. आठवड्याच्या शेवटी, चंद्र देव आपल्या चौथ्या घरात संक्रमण करेल. या संक्रमणामुळे आईबरोबर काही मतभेद उद्‌भवू शकतात. हे मतभेद दूर करण्याचा प्रयत्न करा आणि आपल्या आईशी उघडपणे बोला. तथापि, या राशीच्या काही लोकांना यावेळी जीवनाचा आनंद घेण्याची पूर्ण संधी मिळेल. **महिलांना-** आपण मनोरंजन साधनांवर मुक्तपणे खर्च करू शकता. आपण जर शुक्राची स्थिती पाहिलीत, त्यामुळे आपल्याला संततीबाबत चिंता असू शकते. त्यामुळे तुम्हाला मानसिक समस्येचा त्रासही सहन करावा लागू शकतो. अशा वेळी तुम्ही प्राणायाम वगैरेचा अवलंब करावा, यामुळे आयुष्यात चांगले बदल येतील. सोबत मटकीची उसळ जेवणसोबत घ्यावी. कोणालाही फसवू नका आणि नेहमीच सत्य बोला. फायदा होईल. **शुभदिनांक-** २४,२५

## महत्त्वाची कामे मार्गी लागतील



**कुंभ :** या राशीतील जातकांसाठी हा आठवडा सामान्य राहण्याची अपेक्षा असली तरी काही योगामुळे तुम्हाला आपल्या कामात समस्या येत असेल तर या आठवड्यात त्या दूर होऊ शकणार आहेत. या राशीतील काही जातक या कालवधीत चांगल्या पगाराची नवीन नोकरी प्राप्त करू शकतात. या राशीतील विद्यार्थ्यांना हा कालावधी शिक्षणाच्या क्षेत्रात मनासारख्या फळांची प्राप्ती करून देणारा होऊ शकतो. आपली महत्त्वाची कामे आठवड्यात सुरुवातीसच करून घ्या. या कालवधीत तुम्हाला पोट आणि खांदादुखी समस्या होऊ शकतात. आपले आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी तुम्हाला या कालवधीत एक तर प्रवास टाळला पाहिजे किंवा निकडीची गरज असेल तर कमीत कमी प्रवास केला पाहिजे. **महिलांना-** आपल्या कमाईमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. उधारी वसूल होऊ शकेल, थोडे फार आजारी असणाऱ्या तुमच्या आईवडिलांच्या आरोग्यातही सकारात्मक बदल होण्याची पूर्ण शक्यता आहे. नियमित सकाळी देवी स्तोत्र किंवा कुलदेवीचे नामस्मरण करा. **शुभ दिनांक -** २६,२७

## वरिष्ठांची मर्जी संपादन कराल



**मीन :** राशीतील लोकांना या आठवड्यात बऱ्याच क्षेत्रात आव्हानांचा सामना करावा लागू शकतो. करिअरच्या क्षेत्रात थोडे सांभाळून चालावे लागेल. नोकरी व्यवसायात आपसात वाद होऊ शकतात. कुटुंबातील वातावरण मात्र चांगले राहील. या राशीतील विद्यार्थ्यांसाठी हा कालावधी थोडा विपरीत जाऊ शकतो. त्याचा परिणाम स्वरूप तुमचे अभ्यासात मन लागण्यात समस्या येऊ शकतात. मोठ्यांची मदत घेणे फायद्याचे राहील. राग बाहेर काढण्यापेक्षा मित्रांशी चर्चा करा मार्ग निघेल, टोकाची भूमिका टाळा. महत्त्वाची कामे या आठवड्यात पुढे ढकलणे उत्तम होऊ शकेल. अतिशय गरजेचे असतील तर मध्यात करा. प्रेमात गैरसमज होऊ नये याची काळजी घ्या. खाण्या-पिण्याची यावेळी विशेष काळजी घ्यावी लागेल. सूर्य नमस्काराने आपल्या समस्याचे निराकरण होऊ शकेल. **महिलांना-** या कालवधीत आपल्या मनात अनेक गोंधळात टाकणारे विचार येण्याची शक्यता राहील. थोडा संयम ठेवा, मार्ग सापडेल. शंकराच्या देवळात जाऊन ओम नमो शिवायचा जप आपल्या समस्या सोडवू शकेल. **शुभ दिनांक -** २५,२७



# तो उत्सव की चिकित्सक बुद्धीमत्तेचा खून?

अंकुश शिंगाडे

गणपती उत्सव आनंदानं पार पडला. ज्यात बहुसंख्य मुलांनी भाग घेतला होता. त्यांनी नृत्य केलं होतं. दहा दिवस तर त्यांची मजाच मजा होती. ती मुलं रात्री उशिरापर्यंत गणपतीजवळ विविध कार्यक्रमात व्यस्त असायची. त्यातील अर्धी मुलं शाळेत यायची. सायंकाळी घरी जाताच बिचारी मुलं अभ्यास तर दूरच; गणपतीचीच आरती म्हणत असायची. तसंच गणपती उत्सवात सहभागी होऊन स्वतःच्या अभ्यासाचं नुकसान करीत असायची. त्यातच ते विद्यार्थी जेव्हा शाळेत यायचे, तेव्हा वर्गात चक्क झोपायचे. त्यांचं अभ्यासात मन लागायचं नाही. अशातच शेवटचा तो दिवस उजळला. एक मुलगी वर्गात झोपी गेली होती. कारण ती गणपती विसर्जन करुन आली होती. जिला रात्री झोपायला रात्रीचे दोन तीन वाजले होते. ते पाहून वर्गात गणपतीची चर्चा रंगली व एका विद्यार्थ्यानं सहजच प्रश्न विचारला, 'सर, माणूस जर पाण्यात बुडून मरतो तर गणपती जिवंत कसा असतो की जो दरवर्षी परत येतो?' तो विचार करायला लावणारा प्रश्न. परंतु त्याकडे शिक्षकांनी दुर्लक्ष करीत त्या विद्यार्थ्याला चक्क चूप बसवलं. ज्यातून त्याच्यातील चिकित्सक बुद्धिमत्तेची हत्या झाली होती.

भारतात आर्य आले. त्यांनी आपल्याला त्यांच्या विचारानं गुलाम केलं. त्यांनी देवी देवता प्रसवल्यात व दगडाच्या मूर्तीची पूजा करायला लावून त्यांनी आपल्यावर राज्य केलं. शिवाय, आपल्या मनात घातलं की हीच दगडाची मूर्ती पुजल्यानं आपल्याला फळप्राप्ती होते. परंतु ती आपल्याला मूर्ख बनविण्याची गोष्ट होती. त्याचं कारण आहे. पाषाण मूर्तीपासून काहीच मिळत नव्हतं. मात्र, याच पाषाण मूर्तीच्या अंधश्रद्धेनं नक्कीच लोकांना मूर्ख बनवता आलं व येथील रहिवाशांवर राज्य करता आलं. याबाबतीत एक उदाहरण आहे. देशात गणपती महोत्सव सुरु होता. काही हिंदू धर्मियांनी गणपती घरोघरी व रस्त्या-रस्त्यावर मांडला होता व तो शिरवलाही होता. काही शिक्षकांच्या घरीही गणपती होता. त्यातच शाळेतील काही विद्यार्थ्यांच्याही घरीही गणपती मांडले होते व ते शिरवलेही होते. तशा गणपतीच्या चर्चा वर्गात रंगल्या होत्या. त्यातच एक विद्यार्थी उभा झाला. त्यानं प्रश्न केला. प्रश्न होता, 'सर पाण्यात बुडविल्यावर माणूस मरण पावतो. मग गणपती कसा जिवंत राहतो? तो पाण्यात बुडविल्यावरही कसा दुसऱ्या वर्षी परत येतो? अन् सर तो जर मातीचा असतो, तर तो जिवंत कसा असतो आणि तो जर जिवंत असतो तर तो पाण्यात बुडताना कसा ओरडत नाही?'

तो प्रश्न विचारणारा विद्यार्थी. त्यानं सहजच तो प्रश्न विचारुन टाकला. तो प्रश्न चिकित्सक होता. तसा तो विचारपूर्वक विचारलेला प्रश्न होता. तसं पाहिल्यास गणपतीबाबतच्या चर्चा त्याच्या घरी चालत असतील असे वाटत होते. ज्यातून तो प्रश्न निर्माण झाला होता. तसा प्रश्न त्या वर्गात त्या विद्यार्थ्यांच्या तोंडून ऐकताच सर्व विद्यार्थ्यांच्या नजरा विस्फारल्या. शिकवीत असलेले शिक्षक चूप झाले. काय उत्तर द्यावं ते कळेना. ते शिक्षक विचार करायला लागले. मातीचा गणपती. लोकं बनवतात. तणस, गवत व मातीचा उपयोग करुन. त्यानंतर त्या गणपतीची माती पायांनी तुडवली जाते. त्यानंतर त्याला आकार दिला जातो आणि असा आकार देताना गणपतीचे नाक, डोळे काढले जातातच. ते रंगवले जातात. ते रंगवताना आपली थुंकी लावली जाते ब्रशांना.

गणपती उत्सवात त्या विद्यार्थ्याने वर्गात एकच प्रश्न उपस्थित केला. त्यानंतर त्याच्याच जोडीला असलेल्या इतर दोन-चार विद्यार्थ्यांनीही वेगवेगळे प्रश्न उभे केले. गणपतीसाठी रोषणाई. सर्व लोकं श्रद्धेनं मांडतात. त्यासाठी लाखो रुपये खर्च करतात. कोणी मोदक बनवतात. कोणी लाडू चढवतात. कोणी जेवन बनवतात रंगारंगीचे. तेही त्याच्याजवळ ठेवतात. परंतु तो का खात नाही? सकाळी ते सराव पदार्थ जसेच्या तसे का असतात? त्यानंतर दहा दिवस झाले की लाखो रुपये खर्च करुन बनवलेला गणपती. त्याला पाण्यात का शिरवतात? याचाच अर्थ, त्याला त्याची इच्छा नसताना जबरदस्तीनं पाण्यात बुडवतात. त्यावरुनच त्या विद्यार्थ्यांच्या मनात प्रश्न पडले असतील की, माणूस पाण्यात बुडताच मरतो. मग गणपती का बुडत नाही. तो पुन्हा जिवंत होऊन पुढच्या वर्षी कसा येतो? जर मातीचा गणपती जिवंत असतो तर तो पाण्यात बुडवताना का ओरडत नाही? मला वाचवा का म्हणत नाही. शिवाय, तो लाडू का खात नाही? असे अनेक प्रश्न विद्यार्थ्यांच्या तोंडून त्यानंतर आले होते.

शाळेतील तो वर्ग व त्या वर्गात असलेले कित्येक विद्यार्थी. ते वेगवेगळ्या घरातून आलेले असतात. वेगवेगळ्या वातावरणातून आलेले असतात. त्यांना बरेच प्रश्न पडत असतात. ते वर्गात वेगवेगळे प्रश्न विचारत असतात. ज्यांची उत्तरं शिक्षकांनाही येत नाहीत. मग ते अशा विद्यार्थ्यांना चूप बस म्हणत निराश करीत असतात, थॉमस अल्वा एडीसनसारखं.

एडीसनचंही तसंच झालं. त्यांनीही असेच प्रश्न शिक्षकांना त्याच्या लहानपणी विचारले. ज्यातून त्यांच्या शिक्षकांनी त्याला शाळेतून काढून फेकलं. त्यानंतर त्याला त्याच्या आईनं घरी शिकवलं. त्याच्या सर्व प्रश्नांची उत्तरं दिली. ज्यातून तो एक शास्त्रज्ञ बनला.

आजही तसंच होतं. शाळेत येणारी मुलं. त्या मुलांना असे प्रश्न पडले तर त्यांना त्यांचे शिक्षक चूप बसवतात. त्यांच्या प्रश्नांचे उत्तर देत नाहीत. ते उत्तर देण्याचं टाळतात. त्यांच्या आवडीनिवडी जपत नाहीत. ज्यातून त्यातच काही निराश व्हावे लागते. मग कुतूहल, महत्त्वाकांक्षा, जिद्द आणि जिज्ञासा यांचा मृत्यू होतो. ज्यातून त्या मुलांचे विचार खुंटतात व त्यांच्या मनात नवे विचारच त्यानंतर उद्भवत नाहीत.

भारतात असेच होत आहे. असे चिकित्सक विचार विद्यार्थ्यांच्या मनात उभे राहायला वावच मिळत नाही. ते गणपती आवडीनं मांडतात. त्या उत्सवात सहभागी होतात. त्यानंतर त्या गणपतीजवळ नाचगाणे चालते. ज्यातून भाविकता डोक्यात निर्माण होते. शिवाय, अंधश्रद्धाही डोक्यात जन्म घेते. गणपती अमुक-अमुक करतो. अमुक-अमुक नवसाला पावतो. परंतु, काहीच केलं नाही तर गणपती अन्न देईल का? त्यासाठी नवस करण्याची नाही, तर कामे करण्याची गरज आहे.

भारतातील हा पाषाणरुपी गणपती नवसाला पावतो की नाही. हे काही मला माहीत नाही. मात्र, भारतात गणपती मांडून त्यात दहा दिवस गुरफटून जाणारे लोकं आहेत. ज्यातून लोकांचा विकास होत नाही. परंतु, विदेशात तसे लोकं नाहीत. ते हेच दहा दिवस वेगवेगळे प्रयोग करण्यात घालवतात. म्हणूनच तिथं मुलं शास्त्रज्ञ बनतात व ते नवनवीन शोध लावतात. आज दुसऱ्या महायुद्धात बेचिराख झालेला जपान जर पाहिला तर नवलच वाटेल. काल हिरोशिमा आणि नागासाकीच्या हल्ल्यातून जपान नेस्तनाबूत झाला होता. तरीही तो आज पहिल्या क्रमांकावर आहे, विकासाच्या बाबतीत. कारण तो अंधश्रद्धा पाळत नाही वा अंधश्रद्धेवर विश्वास ठेवत नाही. पाषाणावर तर अजिबात विश्वास ठेवत नाही तो देश. तो विश्वास ठेवतो, कामावर व वेगवेगळे प्रयोग करण्यावर. म्हणूनच तो विकास करतो व शोध लावतो वेगवेगळे. अन् भारतातील लोकं गणपतीच नाही तर वेगवेगळ्या धार्मिक कार्यक्रमात वर्षभर गुरफटून राहतात. अंधश्रद्धा पाळतात. नाचगाणे करतात. ज्यातून शोध लागत नाहीत व त्यांचा विकास खुंटतो. ही झाली गणपतीची गोष्ट.

भारत देशात गणपतीचीच नाहीत तर इतरही बरीच मंदिरं आहेत की जी पाषाणाची असली तरी त्या ठिकाणाची मोठी महती आहे व ते नवसाला पावतात अशी आख्यायिकाही आहे. परंतु, त्या मंदिरात गेल्यास भाविकांना त्या मूर्तीला साधा स्पर्शही करु देत नाहीत. त्याला हारपूजा चढविणारे वेगळेच असतात. असे वेगळे लोकं, अशा मंदिरातून पैसे कमविण्याचा व्यापारच करीत असतात. जे त्याला हारपूजा चढवतात. तीच हारपूजा चढविल्यानंतर त्यातून काढून घेऊन जवळपासच्या दुकानदारांना विकली जाते. त्यानंतर ते दुकानदार तीच हार व पूजा इतर भक्तांना विकतात. काही ठिकाणी असेच हार लहान-लहान मुलांमार्फत विकून बक्कळ पैसा कमवला जातो. अशी मुलं शिक्षण शिकण्याऐवजी व आपल्या ज्ञानाचा उपयोग करुन नवीन शोध लावण्याऐवजी मंदिरातील हार विकण्यावर व भाविकांना लुटून पैसे कमविण्यावर जास्त लक्ष केंद्रित करतात. ज्यातून त्यांचा स्वतःचा विकास होऊ शकतो. परंतु जे नवे शोध लावून देशाचा विकास होऊ शकतो. त्या विकासाचं काय? म्हणूनच देश किती तरी मागे आहे लहानशा जपानपेक्षा. कारण, देशातून तंत्रज्ञ नाहीत तर भाविक तयार होत आहेत. जे पाषाणरुपी देवावर विश्वास ठेवून त्यात गुरफटून जात आहेत.

महत्त्वपूर्ण बाब ही की, पाषाणरुपी देव पुजण्यास मनाई नाही. कारण त्याला पुजण्यातून कलाकारांना काम मिळत असतं. त्यांचंही पोट भरत असतं. मिठाईवाल्यांची मिठाई खपत असते. त्याचंही पोट भरत असतं. मंडप डेकोरेशनवाल्यांना काम मिळत असतं. त्यांचंही पोट भरत असतं. परंतु, हे जरी खरं असलं तरी लहान मुलांना विरंगुळा म्हणून त्यात गुरफटून ठेवणे योग्य नाही. त्यांनी त्यात गुरफटून राहू नये. त्यांना अभ्यास करु देणे अपेक्षित आहे. कारण, ते उद्याचे भविष्य आहेत. तसेच विकसित राष्ट्राचेही भविष्य आहेत. ज्यातून देश विकासाच्या क्षेत्रात आघाडीवर जाऊ शकतो, नव्हे तर जपानसारखा जागतिक महासत्ताही बनू शकतो. हे तेवढंच खरं. **



# घेता घेता देणाऱ्याचा हात घ्यावा

निलेश साठे

देणाऱ्याने देत राहावे, घेणाऱ्याने घेत राहावे, घेता घेता घेणाऱ्याने देणाऱ्याचा हातच घ्यावे. अशी आपल्याकडे एक म्हण होती आणि आहे. परंतु, आजकालची माणसं फार डँबीस झालेत. देणाऱ्याचा हातच मुळासकट काढून घ्यायला लागलेत. म्हणीचा अर्थ असा होता की, देणाऱ्याचा हात घ्यावा म्हणजे त्याचा हातगुण घ्यावा. जसे आपण दुसऱ्याकडून घेत आहे तसेच आपण घेऊन तिसऱ्याला द्यावे आणि आपणही तसेच इतरांना देत राहावे. परंतु, या म्हणीचा पूर्णपणे विपर्यास केलेला दिसतो. पूर्वी माणुसकी होती, विश्वास होता, लोक एकमेकांचा आदर करायचे. मान ठेवायचे. त्यामुळे त्यांनी ज्यांच्याकडे जे जे होते, ते ते देत होते. आपल्याला कमी पडेल अशी भावना त्यांच्या मनामध्ये कधी आली नाही. ते देत राहिले. लोक फक्त घेत राहिले, घेत राहिले, द्यायचं कोणी नावच घेईना. कालांतराने स्वार्थपणा वाढलाच; पण उपकाराची जाणीव ही कोणी ठेवेना. असे झाले. मग देणाऱ्यानेही थोडा हात आखडता घेतला. बरं, कितीही घेतले तरी यांची ओंजळ काही भरे ना, ती सदा न कदा रिकामीच म्हणूनच की काय दुसरी एक म्हण तयार झाली. हल्ली लोक बोट पकडायला दिले तर हातच पकडायला लागलेत. खरोखरच काही माणसं अशी आहेत त्यांना डोक्यावर बसवलं तर खांदा ओला करतील.

त्यामुळेच की काय आता देणाऱ्यांची संख्या कमी होऊ लागली आहे.

घेणाऱ्यांची संख्या इतकी वाढली आहे देणाऱ्याच्या नाकात दम येईल. जणू काही वाट थकतेय की वाटसरू थकतोय. घेणारे फक्त घेतच राहिले. पण मग याच सवयीमुळे पुढे आळशीपणाची सवय लागली. कामधंदा काही करू वाटेनासा झाला. मिळतंय ना मग घ्या फुकट आणि बसा गप अशी प्रवृत्ती वाढली. आणि हेच नेमकं गरिबीचं मुख्य कारण राहिलं. असेल माझा हरी तर देईल पलंगावरी ही वृत्ती वाढीस लागली. आणि माणसाच्या मेहनतीचा घात झाला. आयतं मिळालेले घबाड त्याची किंमत शून्य ठरली. गरिबांचा प्रगतीचा मार्ग इथेच खुंटला. त्यामुळे फुकट कधी कुणाला काही मिळू नये. मेहनत करा, योग्य मोबदला घ्या. आपल्या समृद्धीचा राजमार्ग स्वतःच्या हिमतीवर खुला केला जावा. प्रयत्नांती परमेश्वर असे म्हणत चिकाटीने मेहनतीने आणि जिद्दीने एखाद्या क्षेत्रामध्ये उतरलं तर यश फार काही दूर नाही. वेळ लागेल, उशीर होईल; परंतु मिळणार हे नक्की. जो दुसऱ्याच्या भरवशावर विसंबून राहिला, तो संपला. रात्र वैऱ्याची आहे. जगी सर्व सुखी असा कोण आहे. ज्याचे हातपाय धडधाकट आहेत. जो हिंडू फिरू शकतोय, कष्ट करू शकतो, तोच सर्वात सुखी. केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे. जगामध्ये असं कोणतं क्षेत्र आहे जिथे मानवाने हात टाकला. पण, तो अपयशी परतला. काही ना काही तरी त्याच्या हाती गवसलंच आहे. मग आपणच का बरे मागे राहावे.

जे करायचं ते स्वतःच्या हिमतीवर. कोणापुढे हात पसरायचे नाहीत. काळ सगळं काही ठीक करतो. उत्पन्नाचे अनेक स्त्रोत शोधायचे. शोधले की सापडतेच. आज जरी परिस्थिती खराब असेल तरी ही परिस्थिती कायम राहत नाही. हेही दिवस जातील, असे म्हणत कामाला लागायचे.

नव्या जोमाने, नव्या उत्साहाने, नव्या ताकदीने कार्य करत राहायचं. आज ना उद्या यश मिळणारच आहे. फक्त यशासाठी अतातायीपणा करून चालणार नाही. थोडं धैर्य धरावंच लागेल. जे जे आपल्या मनामध्ये आहे, ते ते सर्व प्रत्यक्षात अवतरणार आहे. हा विश्वास मात्र कधी ढळू द्यायचा नाही.

कुणीतरी देतंय म्हणून आपण घेत राहावं हे चुकीचं आहे. ज्याला खरंच गरज आहे, त्यालाच ते मिळावं, ही भावना नेहमी मनात ठेवावी. आपला हात देणारा असावा, घेणारा नव्हे. हे निसर्गचक्र आहे, जे तुम्ही इतरांना द्याल, तेच दहा पटीने तुमच्याकडे परत फिरून माघारी येईल. मग ती संपत्ती असो किंवा त्रास. वाटल्याने वाढते म्हणून ज्याच्याकडे जे आहे ते तो देत असतो. जसे धनिक धन वाटू शकतो. समाधानी समाधान आणि आनंद वाटू शकतो, भयभीत भय वाटू शकतो. आळशी आणि दुःखी माणूस नकारात्मकता पसरवतो. तुमच्याकडे काय आहे? **

# तुका आकाशा एवढा!

जावे संतांच्या गावा!

अनुराधा म्हात्रे

**तुकाराम महाराजः भाग पाचवा**

ज्ञानेश्वर महाराजांनी दृष्टांचे दुष्टपण जावो असे पसायदान मागितले. पण, दृष्टांचे दुष्टपण इतके चिवट असते की, ते सहजासहजी थोडेच जाते! आता मंबाजीचेच उदाहरण पाहू. तुकारामांना मार देऊनसुद्धा त्यांची शांती ढळली नाही, हे पाहून तो अस्वस्थ झाला. हा तुक्या आपल्या एकट्याच्याने आवरणारे प्रकरण नाही; याची पक्की खूणगाठ त्यांनी मनाशी बांधली. आजकाल लोक जसा राजकीय दबाव आणतात, तसा त्यांनी धर्मशक्तीचा दबाव आणायचे ठरवले.

तो पुण्याजवळच्या वाघोली गावांमध्ये राहणाऱ्या रामेश्वरभट्ट या धर्ममार्तंडांकडे गेला. रामेश्वरभट्ट हे मोठे विद्वान शास्त्री होते. 'देहूचा तुकोबा हा उच्चवर्णीय नसूनही लोकांना धर्माचा उपदेश करतो. धर्माचा चुकीचा अर्थ लावतो' अशी तक्रार मंबाजीने रामेश्वर भट्टांकडे केली.

रामेश्वरभट्टांनी गावच्या पाटलाकडे फर्मान पाठवले. 'या तुकारामाला कीर्तन व अभंग रचना करण्यास बंदी करावी. गावच्या बाहेर हाकलून लावावे'. भगवंताचे भजन, कीर्तन करणे हा तुकाराम बुवांचा श्वास होता. त्यावरच बंदी आल्याने ते अतिशय व्यथित झाले. अखेरीस तुकारामबुवा रामेश्वरभट्टांना भेटायला गेले. रामेश्वरभट्टांनी विचारले, 'तू कोण आहेस?' तेंव्हा तुकोबा म्हणाले, 'मी देहू गावांतील तुकाराम आहे.' रामेश्वरभट्ट कडाडले, 'तू वेदांचा अर्थ बहुजन समाजाला कां सांगतोस? वर वेदांचा अर्थ मलाच ठाऊक आहे, असं म्हणतोस. तुला शिक्षा व्हायलाच पाहिजे'. बुवांनी होकारार्थी मान हलवली. रामेश्वरभट्टांनी हुकूम केला,'तुझ्या अभंगांच्या सर्व वह्या तू इंद्रायणीत बुडवून टाक.' तुकोबारायांनी आज्ञा प्रमाण मानली. देहूंत आल्यावर अतिशय दुःखद अंतःकरणाने त्यांनी अभंगाच्या वह्या इंद्रायणीत बुडवल्या. या घटनेचे त्यांना फार दुःख झाले कारण हे काव्य त्यांनी पांडुरंगाच्या आज्ञेवरून केले होते. तशी त्यांची श्रद्धा होती. त्यांना स्वप्नदृष्टांत झाला होता. स्वप्नांत पांडुरंग आणि नामदेव आले आणि पांडुरंगाने आज्ञा दिली की,'नामदेवाची शतकोटी कविता करण्याची प्रतिज्ञा तू पुरी कर'. तेव्हापासून तुकोबा अभंग रचना करू लागले. हे सर्व अभंग बुडाल्यामुळे ते कष्टी झाले. त्यांनी तेरा दिवस अन्नपाणी वर्ज्य केले. त्यांच्याबरोबर त्यांची पत्नीसुद्धा तेरा दिवस उपाशी राहिली. असे सांगतात की, परमेश्वर कृपेने इंद्रायणींतून या वह्या तरंगून वर आल्या. आजच्या विज्ञान युगामध्ये अशा चमत्कारांवर विश्वास ठेवणे बऱ्याच जणांना जड जाते पण हा ज्याच्या त्याच्या श्रद्धेचा प्रश्न आहे.' भक्त नारायण नुपेक्षी सर्वथा। कृपावंत ऐसे कळो आले'। हे उद्गार बुवांनी या घटनेच्या संदर्भात काढलेले आहेत. अशी वारकरी संप्रदायाची श्रध्दा आहे. एक शक्यता अशीही असेल की, अनेकजण बुवांचे शिष्य झाले होते. बुवांचे अभंग त्यांना मुखोद्गत होते. त्यांनी ते लिहून काढले असतील. असो पण ज्या रामेश्वरभट्टांनी तुकोबारायांना एवढा त्रास दिला, त्यांनाही पुढे तुकाराम महाराजांची योग्यता पटून, केल्या कृत्याचा पश्चाताप झाला. ते तुकारामांच्या भेटीला आले. त्यांच्या पायावर लोळण घेऊन क्षमा मागितली.

काम, क्रोध, मोह, दंभ आदी विकारांचा त्याग करत तुकोबारायांचा प्रवास हळूहळू देवत्वाच्या दिशेने होत होता. सुष्टदृष्ट अशा सर्व लोकांच्या बद्दल तुकोबारायांच्या मनात अतिशय दया आणि करुणा होती. निंदास्तुती, मानापमान हे सर्व त्यांना एकसमान वाटत होते. एकदा गावांतल्या काही दुष्ट लोकांनी तुकोबांची गाढवावरून धिंड काढली. त्याच वेळेला परगावचा एक माणूस त्यांना भेटायला आला होता. तुकाराम महाराजांनी शांतपणे त्याला सांगितले, 'आपण थोडा वेळ थांबावे. ही सातवी फेरी शेवटचीच आहे. तेवढी झाली की, मी आपल्याला भेटायला येतो.' केवढी ही स्थितप्रज्ञता! जो माणूस आदराने आपल्याला भेटायला आलाय त्याच्या समोरच, शत्रूच्याही वाट्याला येऊ नये असा आपला अपमान होतोय, याची त्यांना खंत वाटली नाही. ज्या नीच लोकांची तुकोबांच्या पायाशीसुद्धा उभारण्याची लायकी नव्हती, त्यांनी या देवतुल्य साधूचा घोर अपमान केला होता. मात्र ज्या दुष्ट लोकांनी हे निंद्य कृत्य केले, त्यांच्याबाबत क्रोधही बुवांच्या मनांत उद्भवला नाही. गीतेमध्ये वर्णन केलेल्या स्थितप्रज्ञ पुरुषाची सर्व लक्षणे तुकोबांच्या अंगी होती. प्रसंग कोणताही असो, त्यांचे चित्त कायम स्थिर राहात असे.

परमेश्वर प्राप्तीसाठी आपले चित्त अतिशय शुद्ध राखण्याचा तुकोबाराया आटोकाट प्रयत्न करत असत. अभय हा एक दैवी गुण आहे, मात्र आपण निर्भय असण्याबरोबरच आपल्याबद्दलही कुणाला भय वाटू नये, याची साधूसंत काळजी घेतात. एकदा तुकाराम महाराज नेहमीप्रमाणे हरी स्मरणांत एका वाटेने जात होते. ते जवळ येताच काही पक्षी उडून गेले. बुवांना या गोष्टीचे अतिशय वाईट वाटले. त्यांचे अंतःकरण लोण्याहूनही मऊ होते. त्यांच्या शब्दांत सांगायचे तर, 'मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास' पक्ष्यांना आपल्याबद्दल भय वाटले हे दुःख व्यक्त करताना महाराज लिहितात,

'माझी कोणी न धरो शंका।
विश्व हो कां निर्द्वंद्व।।
तुका म्हणे जें जें भेटे।
तें तें वाटे मी ऐसें।।''

सगळं विश्व माझ्या बाबतीत निर्द्वंद्व व्हायला हवे. कोणीही माझी शंका धरू नये, इतकंच नव्हे तर जो कोणी प्राणीमात्र मला भेटेल तो म्हणजे मीच आहे; हे आत्मज्ञान मला प्राप्त झाले पाहिजे. अशी भावना या अभंगातून ते व्यक्त करतात.



दिवसेंदिवस तुकाराम महाराजांचे चित्त अतिशय शुद्ध होत होते. त्यांचे मन आणि शरीर अगदी गंगाजळाप्रमाणे पवित्र झाले होते. ते स्वतःचे कठोर आत्मपरीक्षण करून आपल्यांत थोडासुद्धा दोष राहू नये याची सतत काळजी घेत होते. पांडुरंगाला आळवीत होते, 'विठ्ठला मला पापवासना देऊ नकोस, त्यापेक्षा आंधळं केलस तरी बरं होईल. कुणाची निंदा माझ्याकडून घडू नये. कोणत्याही प्रकारची अपवित्र वाणी माझ्या मुखांतून येऊ नये आणि शेवटी म्हणतात,

'तुका म्हणे मज अवघ्याचा कंटाळा। तू एक गोपाळा आवडसी।'

महाराजांना इथे सांगतात की, ईश्वराखेरीज मला कोणताच विषय आवडत नाही किंबहुना मला त्याचा कंटाळाच आहे. सदैव या गोपाळाच्या आवडींत राहिल्याने त्यांची इंद्रिय सुद्धा विषयांपासून निवृत्त झाली होती. आपआपला गुणधर्म विसरली होती.

याबाबत एक किस्सा सांगिता जातो. एकदा त्यांच्या पत्नीचे बंधू त्यांच्या घरी आले. भाऊ आला म्हणून जिजाईने खूप आवडीने स्वयंपाक केला पण घाईगडबडीत भाजीत मीठ जास्तच पडले. तुकोबाराया आणि जिजाऊंचे बंधू जेवायला बसले. भावाने बिचाऱ्याने पाण्याच्या घोटाबरोबर भाजी कशीबशी गिळली. आपल्या बहिणीने एवढा प्रेमाने स्वयंपाक केलाय तर नाव तरी कसे ठेवायचे? असा विचार त्या सुज्ञ गृहस्थाने केला. नंतर जिजाई जेवायला बसली. भाजीचा घास घेताच तिला ब्रम्हांड आठवले. तिने भावाला विचारले, 'अरे भाजीत इतकं मीठ जास्त पडलंय, तू मला सांगितले का नाही? मी दुसरी भाजी केली असती.' नंतर ती थोडी रागवून तुकोबांना म्हणाली, 'अहो, तुम्ही तरी मला हे सांगायला हवं होतं.' तुकोबाराया शांतपणे म्हणाले, 'विठोबाची आण घेऊन सांगतो, मला भाजी खारट लागलीच नाही.' सदैव परमेश्वराच्या नामात रंगलेल्या त्यांच्या जिभेला अन्नातील रसाचं सोयरसुतक उरलं नव्हतं. ती ईश्वरनामाच्या मधुर रसातच रंगली होती!


तुकारामबुवांनी संतांचे वर्णन केले आहे,

'ब्रह्मरसगोडी तयांसी फावली।
वासना निमाली सकाळ ज्यांची।।'

महाराज स्वतःच साधनेच्या बळावर या स्थितीला पोहोचले होते. **

# स्कॉलरशिप परीक्षा : गणिती सूत्रे, क्लृप्त्या व युक्त्या

आकडेमोड
राजेंद्र पाटील
९८२२३०२०८५




आजच्या स्पर्धात्मक जीवनामध्ये प्रगती साधायची असेल तर विद्यार्थ्याला विद्यार्थी जीवनापासूनच स्पर्धात्मक परीक्षांची सवय असली पाहिजे. या शासनाच्या धोरणातून खरेतर अनेक स्पर्धा परीक्षा घेतल्या जातात. या स्पर्धा परीक्षेतलाच एक भाग म्हणून स्कॉलरशिप परीक्षेकडे पाहिले जाते.

स्कॉलरशिप परीक्षा म्हणजे प्रत्येक शाळा व शिक्षक यांच्या आत्मीयतेचा विषय आहे. आपले विद्यार्थी जास्तीत जास्त संख्येने स्कॉलरशिप परीक्षेत पास होणे, ही प्रत्येक शिक्षकाची धडपड असते. त्यासाठी वर्षभर नियोजन केले जाते. शाळेच्या तासिकांव्यतिरिक्त जादा तासिकांचे नियोजन शाळा भरण्यापूर्वी सकाळी अथवा शाळा संपल्यानंतर संध्याकाळी करण्यात येते.

विद्यार्थी, पालक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती, मुख्याध्यापक, सहकारी शिक्षक एक टीम बनून वर्षभर स्कॉलरशिप परीक्षेवर काम करीत असतात. पूर्वी इयत्ता ४ थी व इयत्ता ७ वीसाठी या परीक्षांचे नियोजन असायचे. मात्र, आत्ता शासनाच्या सुधारित धोरणानुसार इयत्ता ५ वी व इयत्ता ८ वीसाठी या परीक्षांचे आयोजन करण्यात येत आहे. कालपरत्वे प्रत्येक गोष्ट बदलत असते. या नियमाने या परीक्षेतसुध्दा काही जुजबी बदल करण्यात आले आहेत.



काठीण्य पातळीमध्ये वाढ करण्यात आली आहे. काही पाठ्यांशामध्ये वाढ करण्यात आली आहे. काही पाठ्यांश कमी केलेले आहेत अथवा काढण्यात आलेले आहेत. असे जरी असले, तरी विद्यार्थी व शिक्षक यांच्या मेहनतीला कोणताच विराम नाही, कोणताच पर्याय नाही. खरे तर, ही परीक्षा उत्तम गुणांनी पास करायची असेल तर मेहनतीबरोबरच काही सूत्रे, युक्त्या, क्लृप्त्या यांचा वापर आणि अभ्यास करणे खूप गरजेचे आहे. या अनुषंगाने शिक्षक मित्र व विद्यार्थी मित्रांसाठी गणित विषयातील काही सूत्रे, क्लृप्त्या व मुद्दे या लेखाच्या माध्यमातून मी आपणासमोर सादर करीत आहे.

१) ० हा अंक असणाऱ्या १ ते १०० मधील संख्या १०, ० हा अंक १ ते १०० संख्यांमध्ये ११ वेळा येतो.

२) १ ते ९ यापैकी प्रत्येक अंक १ ते १०० मधील संख्यांमध्ये २० वेळा येतो.

३) **मूळ संख्या** : २,३,५,७, । ११,१३,१७,१९, । २३,२९ । ३१,३७,। ४१,४३,४७ । ५३,५९ । ६१,६७ । ७१,७३,७९। ८३,८९ । ९७ (एकूण २५)

**४) संयुक्त संख्या :** १ ते १०० मधील संयुक्त संख्या एकूण ७४, १ ही संख्या मूळ संख्या देखील नाही, संयुक्त संख्याही नाही.

५) गणिती क्रियांचा क्रम

अ) सर्वात आधी कंस सोडवावा, नंतर गुणाकार/भागाकार व शेवटी बेरीज-वजाबाकी करावी.

आ) बेरीज-वजाबाकी अथवा गुणाकार, भागाकार या क्रिया एकत्रित असल्यास डावीकडील क्रिया आधी करावी.

६) समान छेद असलेल्या अपूर्णांकांची बेरीज, वजाबाकी करताना अंशाची बेरीज/वजाबाकी करावी. छेद तसाच कायम ठेवावा.

७) समान छेद असलेल्या अपूर्णांकामध्ये ज्याचा अंश मोठा तो अपूर्णांक मोठा व ज्याचा अंश लहान तो अपूर्णांक लहान.

८) समान अंश असलेल्या अपूर्णांकामध्ये ज्याचा छेद छोटा, तो अपूर्णांक मोठा व ज्याचा छेद मोठा, तो अपूर्णांक लहान.

९) ज्या त्रिकोणाच्या दोन बाजू समान असतात, त्या त्रिकोणाला समद्विभूज त्रिकोण म्हणतात.

१०) ज्या त्रिकोणात तिन्ही बाजू समान असतात, त्या त्रिकोणाला समभूज त्रिकोण म्हणतात.

११) ३१ दिवशी महिना= ४ आठवडे + ३ दिवस, ३० दिवशी महिना= ४ आठवडे + २ दिवस.

१२)२९ दिवशी महिना = ४ आठवडे + १ दिवस, २८ दिवशी महिना = ४ आठवडे.

१३) ३१ दिवशी महिन्यात १,२,३ तारखांचे वार ५ वेळा येतात, ३० दिवशी महिन्यात १,२ तारखांचे वार ५ वेळा येतात. २९ दिवशी महिन्यात १ तारखेचा वार ५ वेळा येतो आणि २८ दिवशी महिन्यात कोणताच वार ५ वेळा येत नाही.

या आणि यासारखी इतर सूत्रे, क्लृप्त्या मुद्दे यांचा सातत्याने सराव घेऊन स्कॉलरशिप परीक्षेमध्ये आपल्या विद्यालयाचा आपण चांगला निकाल घेऊ शकतो. **

# उत्तम पालकत्व विचार

रेश्मा धुमाळ



'जे शिक्षण मनुष्याला इतरांच्या हृदयात नेत नाही, इतरांच्या हृदयात सत्यसृष्टी दाखवीत नाही, ते शिक्षण नव्हे. शिक्षणाने मला प्रत्येक वस्तू, प्रत्येक व्यक्ती म्हणजे ज्ञानमंदिर वाटले पाहिजे. हृदयाचा विकास ही एक महत्त्वाची जीवनाला सुंदरता व कोमलता आणणारी वस्तू आहे. या विकासाला मी प्राधान्य देईन.'परमपूज्य साने गुरुजींचे हे शिक्षणाबद्दलचे विचार आहेत. शिक्षणाबद्दलचे अत्यंत परिपूर्ण असे हे विचार आहेत. अखंड देशपातळीवरील शिक्षणप्रणालीला हे विचार अभिप्रेत असले पाहिजेत.

पृथ्वीवर मानवी मूल्यांचा स्वर्ग बघायचा असेल तर शिक्षण व्यवस्थाही तितकीच परिपूर्ण हवी. विद्यार्थी हा अखंड शिक्षणप्रणालीतील सर्वांत महत्त्वाचा घटक. त्यामुळे ह्या गोष्टीचा साकल्याने विचार व्हायला हवा. उत्तम पालकत्व परिणाम म्हणजे उत्तम व्यक्ती व देशाचा भावी उत्तम नागरिक असे गृहीत धरायला हरकत नाही.

''विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास'' हे शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. ते साध्य करण्याकरिता शिक्षण व्यवस्थेला कंबर कसावी लागेल. आजच्या आंतरजाल आणि संगणकाच्या काळात वास्तविक विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास व्हायला हरकत नाही. परंतु, ते होताना दिसत नाही. कारण पालकत्वाचा परिपूर्ण नसलेला विचार. हा एक विचार. त्या जोडीला शिक्षणाची वास्तविक स्थिती हा दुसरा विचार.

पालकत्वाचा विचार करता केवळ विद्यार्थ्याचे आईवडील अथवा पालक हेच पालक आहेत की विद्यार्थ्यांच्या शिक्षणप्रक्रियेत येणारे इतरही घटक पालकच मानावे. ह्या गोष्टीचा खोलात जाऊन विचार करावा लागेल. बऱ्याच वेळा विद्यार्थ्याचे पालनपोषण करणारेच केवळ पालक असतात, असे समजण्याची गल्लत केली जाते. अर्थात, विद्यार्थ्याचे जे कोणी खरेखुरे पालक असतात त्यांच्या दृष्टिकोनातूनही विचार करायला हवा. एक काळ असा होता की, विद्यार्थ्याचे पालक हे अशिक्षित होते. दुर्गम भागात राहणारे होते. त्यामुळे त्यांना शिक्षणाचे तेवढे गांभीर्य नव्हते. पण आज पालकवर्गही थोडाफार शिकलेला आहे. त्यामुळे शिक्षणाबद्दल त्यांच्यामध्ये आवश्यक ती जागरूकता आलेली आहे. असे म्हणणे वावगे ठरणार नाही. ''आपण शिकलो नाही पण आमची मुले शिकली पाहिजेत. शिकून मोठी झाली पाहिजेत'' असे संवाद कानी पडतात. त्यामुळे सध्याच्या पालकांमध्ये जागृती नाही असे म्हणता येणार नाही. मग घोडं कुठे अडतंय?

विद्यार्थ्याच्या पालकत्वासंदर्भात विचार करता शाळेतील शिक्षक व मुख्याध्यापक हेही लौकिक अर्थाने त्यांचे पालकच आहेत. विज्ञान युगाने जग जवळ आले आहे. खेड्यांचाही जलद गतीने विकास होत आहे. पण मुलांची जितकी आणि जशी प्रगती व्हायला पाहिजे, तशी होताना दिसते का? हे असे का होते? याचा खोलात जाऊन विचार करण्याची आज गरज निर्माण झाली आहे.

गावाकडच्या काही शाळांना भेट दिल्यानंतर जे वास्तव समोर आले ते अत्यंत चिंताजनक वाटले. एका गावातील मराठी शाळेत पहिली ते चौथीपर्यंतच्या वर्गांचा एकूण पट केवळ अकरा विद्यार्थी. आणि ह्या अकरा विद्यार्थ्यांमागे दोन शिक्षक कार्यरत आहेत. दुसऱ्या एका गावातील पहिली ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा पट ८५ आहे. मात्र, सद्यःस्थितीत दोनच शिक्षक कार्यरत आहे. शाळा सुरू होऊन जवळजवळ अडीच महिने झाले आहेत. परंतु, अजून शिक्षक आलेले नाहीत. हल्ली ऑनलाईन माहिती रोजच्या रोज पाठवाव्या लागतात. अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करणे, त्याचबरोबर काही संबोध पूर्ण करून घेणे. मूल्यमापन प्रक्रिया राबवणे तसेच उपक्रम घेणे अशा कितीतरी गोष्टी शालेय स्तरावर राबवाव्या लागतात. त्यातच शाळाबाह्य कामे तर शिक्षकांच्या पाचवीलाच पुजलेली आहेत. शिक्षकांनी करायचे काय? शासन हा जर पालक म्हणून गणला गेला तर वरील वास्तव शासनाने दुर्लक्षित करून चालणार नाही. शाळांना पुरेशा सोयी सुविधा पुरवल्या पाहिजेत. आवश्यकतेनुसार शिक्षकांचा भरणा करावयास हवा. शासनाची ह्यामध्ये फार मोठी भूमिका राहणार आहे. पण, ही यंत्रणा जेव्हा कुचकामी होते, तेव्हा शिक्षणाचे तीनतेरा वाजतात.

'नहि ज्ञानेनं पवित्र सदृश्य इहम विद्यते।' ज्ञानाइतकी पवित्र गोष्ट दुसरी कुठलीच नाही, असे भगवद्गीता सांगते. खऱ्या ज्ञानानेच संस्कृती उभी राहते. कुटुंब उभे राहते. समाज आणि देश उभा राहतो. असं शाश्वत ज्ञान देणारी यंत्रणाच जेव्हा खिळखिळी होते, तेव्हा चांगल्या सांस्कृतिक मूल्यांपासून समाज कितीतरी योजने दूर जातो. शिक्षण क्षेत्रात जर अनास्था असेल, तर पिढ्यान्‌पिढ्या समाजात रुजलेली चांगली सांस्कृतिक मूल्ये नष्ट व्हायला वेळ लागत नाही. जिथे विद्यार्थ्यांचं पालनच बरोबर होत नाही, तिथे त्यांच्या ज्ञानपोषणाचं काय? विद्यार्थ्यांच्या पालकांमध्येच अनास्था असेल तर त्यांच्यात आस्था निर्माण करण्याचे काम विविध माध्यमातून व्हायला पाहिजे. एकटा शिक्षक ही भूमिका पार पाडण्यास असमर्थ ठरेल. शासन नावाच्या पालकाने यात हस्तक्षेप करायला हवे. उत्तम पालकत्वाची जबाबदारी केवळ आईवडिलांचीच नाही, तर शालेय प्रशासन आणि शासन यांनीही ती जबाबदारी आपल्या खांद्यावर घ्यायला हवी. तेव्हाच साने गुरुजींचे शिक्षण विचार प्रत्यक्षात उतरण्याची स्वप्ने आपण बघू शकतो.

(९४२१२५५३४५)


**

# पाऊस पाडता वा रोखता येणार!

**भारतीय हवामान शास्त्रज्ञांच्या मते, पुढील पाच वर्षांमध्ये आपण कृत्रिम पध्दतीने पाऊस पाडण्याच्या वा रोखण्याच्या तंत्रज्ञानाद्वारे आवश्यक तेथे पाऊस पाडू किंवा रोखू शकू. त्यासाठी आवश्यक प्रशिक्षणासाठी येत्या अठरा महिन्यांमध्ये सिम्युलेशन लॅबची निर्मिती केली जाईल. या जटिल तंत्रज्ञानाला आजवर मर्यादित यश मिळाले आहे. मात्र, सरकारने अर्थसंकल्पात तरतूद म्हणून ३००० कोटी रुपयांच्या खर्चाला मान्यता दिली आहे.**

शंतनू चिंचाळकर





निसर्ग ही भूतलावरील प्राणिमात्रांसाठी, जीवजंतुंसाठी आणि वनस्पतींसाठी अमूल्य देणगी आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये. सृष्टी ही नैसर्गिक नियमांनी चालत असते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मानवाने आपल्या फायद्यासाठी या नैसर्गिक नियमांमध्ये आमुलाग्र बदल केले. आता यात भर म्हणून आवश्यक त्या ठिकाणी कृत्रिमरीत्या पाऊस पाडणे; किंवा अतिवृष्टी होत असलेल्या ठिकाणी पावसावर अंकुश ठेवणे, हा मानवाने भूतलावरील हवामानात बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने लावलेला महत्वाचा शोध म्हणावा लागेल. पण या बदलांव्दारे फलप्राप्तीसाठी त्याला शेवटी निसर्गावरच अवलंबून रहावे लागले. असे असले तरी आजघडीला हा एक महत्वाचा लक्षवेधी विषय ठरतो आहे. कृत्रिमरीत्या पाऊस पाडण्यासाठी काळ्या ढगांमधल्या बाष्पाची क्षमता, तापमान, वाऱ्याची दिशा आणि वेग असे अनेक घटक आवश्यक असतात. म्हणजे आधुनिक तंत्रज्ञानालादेखील नैसर्गिक देणगीचा वरदहस्त जरुरी असतो. यातल्या कोणत्याही एका घटकाचा असमतोल झाल्यास पावसाची शक्यता कमी होते. अशा वेळी ढगांमधील बाष्पाचं प्रमाण वाढवून विशिष्ट तापमानाला थंड केले की त्याचे पाण्याच्या थेंबांमध्ये रूपांतर होतं. काळ्या ढगांवर विशिष्ट परिस्थितीत रसायने फवारून पाऊस पाडणे म्हणजेच कृत्रिम पाऊस. काळ्या ढगांप्रमाणेच अधिक उंचीवर असलेल्या पांढऱ्या ढगांमधूनही पाऊस पाडता येतो. त्यासाठी सिल्व्हर आयोडाईड फवारले जाते. अमेरिका, इस्रायल, चीन, कॅनडा, रशिया, आफ्रिकेतील काही देश आणि युरोपीय देशांमध्येसुद्धा असे प्रयोग केले जातात. हे तंत्र हुकमी पध्दतीने वापरण्याच्या दृष्टीने आपल्याकडे हालचाली सुरु आहेत.

हवेतले बाष्प एकत्र येऊन पावसाचा थेंब बनण्यासाठी एखाद्या लहानशा कणाची आवश्यकता असते. एखादा सूक्ष्म कण हा पावसाच्या थेंबाच्या केंद्राची भूमिका बजावतो. या केंद्रावर बाष्प जमा होत जाते आणि आकार वाढला की तो पावसाचा थेंब म्हणून जमिनीवर पडतो. पण ही पावसाच्या थेंबाची निर्मिती नैसर्गिकरीत्या थांबते, तेव्हा ती कृत्रिमरित्या घडवून आणावी लागते. त्यासाठी काळ्या ढगांवर सोडियम क्लोराईड म्हणजेच मिठाचे कण फवारले जातात. मिठाच्या पाणी शोषण्याच्या गुणधर्मामुळे या कणांभोवती ढगातील बाष्प जमा होते. कृत्रिम पाऊस या अर्थाने उपयुक्त आहे. त्याद्वारे हवेचे प्रदूषण काही प्रमाणात विरळ केले जाते आणि धुके, रसायने आणि धूळ यांचे प्रमाण कमी करण्यास मदत होते. कृत्रिम पावसामुळे कमतरता असलेल्या भागात पावसाचे प्रमाण वाढण्यास मदत होते. आपल्या देशाच्या मुख्य भूभागाच्या दहा टक्के भागात वास्तव्य कठीण आहे, कारण त्या भागात पाऊस कमी प्रमाणात पडतो. ही रखरखीत किंवा अर्ध-शुष्क ठिकाणे कृत्रिम पावसाने अधिक राहण्यायोग्य बनवता येतील. त्यामुळे राहणीमानातही सुधारणा होईल. शेतीसाठी अत्यावश्यक बाब म्हणजे पाणी. नैसर्गिक पर्जन्यमान मर्यादित असलेल्या ठिकाणी कृत्रिम पाऊस शेती उत्पादनाला चालना देऊ शकतो. पर्यायाने कृषी उत्पादनातील ही वाढ आर्थिक वाढीला चालना देते, स्थानिक लोकसंख्येला मुबलक प्रमाणात अन्न पुरवते आणि मुबलक कृषी संसाधने असलेल्या राष्ट्रांवरील अवलंबित्व कमी करते. स्थानिक मागणी पूर्ण करण्यासाठी, सेंद्रिय शेतीसारख्या तंत्राद्वारे उत्पादनात वाढही होते.

असे असले तरी कृत्रिम पावसाचे फायदे असूनही काही लोक चिंतित आहेत कारण, निसर्गाशी छेडछाड करणे धोकादायक ठरू शकते. असा कृत्रिम पाऊस पाडण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या रसायनांमुळे पर्यावरण आणि लोकांवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. सिल्व्हर आयोडाईडसारखी वापरली जाणारी काही संयुगे पर्यावरणासाठी घातक ठरू शकतात. कृत्रिमरीत्या पाऊस निर्माण करणे अभ्यासासाठी फायदेशीर ठरले असले, तरी त्याचे गंभीर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतात. हवामानात बदल करणे काही भागात फायदेशीर असले तरी त्याचा संपूर्ण देशाच्या वातावरणावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो. निसर्गाला पूर्णपणे समजून घेणे कठीण आहे. त्यावर आपले पूर्ण नियंत्रण नाही. हे कृत्रिम पावसाच्या निर्मितीचे महत्वाचे तोटे म्हणता येतील. अशा प्रकारे पाऊस 'तयार करणे' खूप महाग आहे. थोड्या प्रमाणात पाऊस तयार करण्यासाठी लाखो डॉलर्सची आवश्यकता असते. त्याचा अर्थव्यवस्थेला फायदा होत असला तरी जनता त्याची किंमत मोजत नाही. हे करायचे असेल तर सरकारला खूप पैसा खर्च करावा लागेल. तो खर्च आपल्यासारख्या विकसनशील देशाला कितपत परवडेल याबाबत शंका आहे. शिवाय एखाद्या योजनेवर मोठ्या प्रमाणावर खर्च करायचा तर काही गोष्टींचा निश्चित विचार करावा लागेल. उदा. कृत्रिम पाऊस पडण्यासाठी काळे ढग आवश्यक असतात. परतीच्या पावसाच्या ढगांमध्ये पर्जन्यक्षमता अधिक असते, हे तंत्र त्यावेळीच वापरणे फायदेशीर असेल. त्यामुळे या योजनेची परिणामकारकता स्पष्ट नाही. आयआयटी कानपूर टीमच्या म्हणण्यानुसार कानपूरमध्ये कृत्रिम पावसाच्या चाचण्यांच्या सातपैकी सहा प्रयत्न यशस्वी झाले.

अधिकाऱ्यांच्या मते, हिवाळ्यात दिल्लीतील वायू प्रदूषण कमी करण्याचे साधन म्हणूनही या तंत्राची व्यवहारिकता प्रमाणित केली गेली. २०१८ मध्ये दिल्लीमध्ये कृत्रिम पाऊस पाडण्याचा प्रयत्न केला गेला. त्या वेळच्या योजनेमध्ये सुमारे ३०० चौरस किलोमीटर अंतराचा समावेश होता. हवामान अनुकूल नसल्याने तो प्रयोग स्थगित करावा लागला. दुसरा प्रयोग यशस्वी झाल्यास अंतर एक हजार चौरस किलोमीटरपर्यंत वाढवण्याचा मानस होता. पहिल्या टप्प्यासाठी तीन कोटी रुपये आणि दुसऱ्या टप्प्यासाठी दहा कोटी रुपये खर्च आला. दिल्लीच्या १,४८३ चौरस किलोमीटर विस्तीर्ण प्रदेशात प्रचंड खर्च अपेक्षित होता. कृत्रिम पाऊस या संकल्पनेची परिणामकारकता अस्पष्ट असल्याने या योजनेवर इतका खर्च व्यवहारीक वाटतो का, याचा विचार नक्की करावा लागेल. शिवाय प्रदूषणावर उपाययोजना म्हणून आणि शेतीसाठी आवश्यक म्हणून ही योजना राबवताना स्वतंत्र विचार करावा लागेल. ढगांच्या संक्षेपणामुळे निर्माण होणारे बर्फाचे मोठे कण काही ठिकाणी मालमत्तेचे गंभीर नुकसान करू शकतात. कृत्रिम पावसाचे तंत्र वापरून असे संक्षेपण टाळून मालमत्तेची आणि वन्यजीवांची हानी वाचवता येते. वायोमिंग आणि केंब्रिज विद्यापीठांच्या संशोधनातून दिसून आले आहे की क्लाउड सीडिंगमुळे हिमवर्षाव होऊ शकतो. तो कसा आणि किती प्रमाणात होईल, याचा अंदाज बांधणे हे शास्त्रज्ञांपुढील आव्हान असेल.

भारतीय हवामान शास्त्रज्ञांच्या मते, पुढील पाच वर्षांमध्ये आपण तंत्रज्ञानाद्वारे आवश्यक तेथे पाऊस पाडू शकू आणि अनावश्यक असेल तिथे पाऊस रोखू शकू. त्यासाठी आवश्यक प्रशिक्षणासाठी १८ महिन्यांमध्ये सिम्युलेशन लॅबची निर्मिती केली जाईल. एका सिम्युलेशन सेंटरद्वारे हवामान विषयक सविस्तर प्रशिक्षण आणि माहिती दिली जाईल. पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सेक्रेटरी श्री. एम. रविचंद्रन यांच्या मते अशा सेंटरद्वारे हवामानाचा अंदाज देण्यात पाच ते दहा टक्के वाढ अपेक्षित असेल. पण तज्ज्ञांच्या मताप्रमाणे हे एक जटिल तंत्रज्ञान आहे. आजवर त्यात मर्यादितच यश मिळाले आहे. अशा परिस्थितीत केंद्र सरकारने अर्थसंकल्पात तरतूद म्हणून ३००० कोटी रुपयांच्या खर्चाला मान्यता दिली आहे.

देशाच्या एकूण बजेटचा विचार करता हा खर्च या मिशनवर करायला हरकत नसावी. आपण महाराष्ट्र आणि देशात अन्य काही ठिकाणी असे प्रयोग केले असून त्यांचे संमिश्र परिणाम पहायला मिळाले आहेत. त्यामुळे येत्या काही वर्षांमध्ये हवामानाचा अंदाज देण्यात अगदी तंतोतंत नसले तरी अचूकतेच्या जवळपास पोहोचण्यात आपण उल्लेखनीय यश प्राप्त करून आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन आवश्यक कृत्रिम पाऊस पाडू शकू, असा विश्वास संशोधकांना वाटत आहे. **

# अलिबागमध्ये शिवआरमार विजय दिवस साजरा

## सुभेदार मायनाक भंडारी यांना अभिवादन



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

भंडारी बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे शिवआरमार पहिला विजय दिवस गुरुवारी (दि.१९) साजरा करण्यात आला. यावेळी स्वराज्याचे पहिले आरमार प्रमुख सुभेदार मायनाक भंडारी यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून त्यांना अभिवादन करण्यात आले. अलिबागमधील मेटपाडा येथे हा कार्यक्रम पार पडला.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेच्या काळात शिवाजी महाराजांनी अनेक किल्ल्यांची नव्याने उभारणी केली. अनेक किल्ल्यांचे पुनरुज्जीवन केले. याच किल्ल्यांच्या सहाय्याने आदिलशहा, कुतुबशहा, पोर्तुगीज, मोगल तसेच बलाढ्य इंग्रज यांच्या साम्राज्याला महाराजांनी शह दिला. किल्ले हे महाराष्ट्राचे भूषण व स्फूर्तिस्थान बनलेले आहेत. या किल्लयांचा इतिहास जाणून घेतल्याने प्रेरणा मिळते. त्यापैकीच एक अलिबाग तालुक्यातील खांदेरी जलदुर्ग किल्ला आहे. स्वराज्याचे पहिले आरमार प्रमुख सुभेदार मायनाक भंडारी यांनी छत्रपती शिवरायांनी समुद्रमार्गे येणाऱ्या परकीय शत्रुंचा धोका ओळखून १६५८ साली स्वराज्य आरमाराची मुहूर्तमेढ रोवली. जंजिरेकर सिद्धी, रेवदंड्याचे पोर्तुगीज, डच, मुंबईकर इंग्रज या परकीय शत्रूंपासून असणारा धोका ओळखून मुंबईपासून जवळच असलेल्या खांदेरी बेटावर किल्ला उभारण्याचे ठरवले. तो उभारण्याची जबाबदारी सुभेदार मायनाक भंडारी यांच्यावर सोपवली. मायनाकांनी आपल्या कडव्या शिलेदारांच्या साहाय्याने ती जबाबदारी स्विकारून दिवसा युद्ध आणि रात्रीत किल्ल्याचे बांधकाम, अशा रितीने किल्ला उभारून स्वराज्य आरमाराचे ठाणे निर्माण केले.

४०० वर्षांची नाविक परंपरा असलेल्या आणि तोवर नाविक युद्धात अपराजित असलेल्या ज्यांनी पुढे सव्वाशे वर्षे भारतावर सार्वभौम सत्ता गाजवली त्या इंग्रजांचा जगाच्या इतिहासातील पहिला आरमारी पराभव १९ सप्टेंबर १६७८ रोजी पहिले आरमार प्रमुख सुभेदार मायनाक भंडारी यांनी त्यांच्या नेतृत्वाखाली खांदेरी युद्धा दरम्यान केला. सुभेदार मायनाक भंडारी आणि त्यांच्या शिलेदारांच्या शौर्य, कर्तृत्व, पराक्रमाचे स्मरण करण्यासाठी १९ सप्टेंबर हा शिवआरमार पहिला विजय दिवस अलिबागमध्ये साजरा करण्यात आला. तसेच, खांदेरी युद्धादरम्यान ब्रिटिशांचा जगाच्या इतिहासातील पहिला पराभव केलेला १९ सप्टेंबर हा शिवआरमार विजयी दिवस म्हणून सरकारतर्फे खांदेरी किल्ला येथे राष्ट्रीय पातळीवर साजरा करण्यात यावा, अशी मागणी भंडारी बहुउद्देशिय सामाजिक संस्थेने केली आहे.

यावेळी नागावचे माजी सरपंच नंदकुमार मयेकर, कित्ते भंडारी हितवर्धक मंडळ रेवदंडा-चौलचे अध्यक्ष सुरेश खोत, अलिबागचे उपाध्यक्ष कमलाकर पडवळ, संतोष किर, शास्त्रीनगर-खारगल्ली भंडारी समाज अध्यक्ष महेश पाटील, तसेच संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# जातीय सलोखा राखण्याची परंपरा जपा

## ■ पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांचे आवाहन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

भारत देशामध्ये अनेक जाती धर्माची मंडळी आहेत. स्वातंत्र्यासाठी सर्व जाती, धर्मातील मंडळींनी एकत्र येऊन लढा दिला. त्यामध्ये सर्वांचे योगदान मोलाचे राहिले आहे. प्रत्येक समाजात चांगली लोक आहेत. ते पुढे येणे, एकत्र येणे आवश्यक आहे. सण, उत्सव एकत्रित साजरे करण्याची परंपरा देशासह रायगड जिल्ह्याला लाभली आहे. यातून जातीय सलोखा राखण्याची परंपरा जपली आहे. ही परंपरा पुढे नेण्याचा प्रयत्न करा, असे आवाहन पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी केले. जमाते मुस्लिम चावडी मोहल्ला अलिबाग यांच्यावतीने दरवर्षी प्रमाणे यावर्षी देखील ईद मिलाद उन नबीचा कार्यक्रम नुकताच चावडी मोहल्ला येथे उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी विनित चौधरी, अलिबाग पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक किशोर साळे आदी मान्यवरांसह चावडी नसीम बुकबायंडर, वाशिम साखरकर, डॉ. साजिद शेख, मुज्जफर पल्लावकर, अशरफ घट्टे, असीम पालकर, नवशिन पटेल, अझहर घट्टे, अदनान पल्लवकर, मजहर भालदार, फारूक सय्यद, दानिश शेख आणि अलिबाग मधील मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मालाडच्या विद्यार्थ्यांनी घेतले शेतीचे धडे

## कर्जतच्या संशोधन केंद्रातील भेट ठरली अस्मरणीय



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मुंबईमधील मालाड येथील उत्कर्ष मंदिर शाळेतील दहावीमधील दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी कर्जतच्या प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राला नुकतीच भेट दिली आहे. विद्यार्थी व शास्त्रज्ञ यांच्यामध्ये सुसंवाद झाला. यावेळी विद्यार्थ्यांना शेतीचे महत्व, फायदे याची माहिती देत त्यांना शेतीविषयक धडे देण्यात आले. ही भेट या विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय ठरली आहे. महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद पुणे तसेच डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य विनायक काशिद यांच्या प्रेरणेने अभ्यास दौरा रायगड जिल्ह्यातील कर्जत येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रात काढण्यात आला होता. यामध्ये शाळेतील २१६ विद्यार्थी सहभागी झाले होते.

यावेळी डॉ. बाळासाहेब सावंत, कोकण कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. प्रकाश शिनगारे, उद्योजक विनायक काशिद, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे महासंचालक रावसाहेब भागडे, डॉ. बाळासाहेब सावंत, कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजय भावे आदी तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यातील काहींनी दूरदृश्यप्रणालीद्वारे संवाद साधत शेती विषयक माहिती विद्यार्थ्यांना दिली. विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे निरसनही केले. यावेळी सहयोगी संशोधन संचालक डॉ. भरत वाघमोडे, श्रीधर गांगल, प्रतिभा अडूरकर, डॉ. विजय सागवेकर, डॉ. शशिकांत मेश्राम, डॉ. प्रवीण वणवे उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. भावे म्हणाले की, शेतीसारखा फायदेशीर व्यवसाय अन्य कोणताही नाही. कोरोनासारख्या कितीही महामाऱ्या आल्या तरी शिक्षण आणि कृषी अव्याहतपणे सुरू राहील. दुसऱ्याच्या हाताखाली काम करण्याची मानसिकता सोडून विद्यार्थ्यांना कृषिक्षेत्रात आभाळभर संधी आहे. स्वतःचा व्यवसाय वा उद्योग उभारण्याची मनीषा ठेवून शिकलेल्या व्यक्तींना सोबत घेवून कृषिपूरक व्यवसाय, प्रक्रिया उद्योगाद्वारे रोजगार निर्माणकर्ते व्हायला हवे, असे त्यांनी सांगितले. यावेळी सहभागी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले.

# विज्ञान, कौशल्य प्रकल्प कार्यशाळा

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील श्रमिक विद्यालय चिल्हे येथे विज्ञान आणि कौशल्य प्रकल्प अंतर्गत कार्यशाळा मोठ्या उत्साहात संपन्न करण्यात आली. धाटाव औद्योगिक वसाहतीमधील सुदर्शन केमिकल कंपनीच्या सीएसआर फंडाच्या माध्यमातून या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. तर, मुख्याध्यापक दिपक जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यशाळा उपक्रमात विज्ञान आणि प्रकल्प कार्यशाळेत भार्गवी इंटरप्राईजसचे प्रमुख तथा मुख्य मार्गदर्शक मनोज शितोळे व संगीता शितोळे यांनी उपस्थित शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांना मार्गदर्शन केले. यावेळी सुदर्शन कंपनीचे सीएसआर फंडाचे प्रमुख अमर चांदणे, मुख्याध्यापक दिपक जगताप व सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

# महागाईमुळे सर्वसामान्य जनतेचे हाल

## हॉटेल व्यावसायिकांवर परिणाम

**। कोलाड । वार्ताहर ।**

दिवसेंदिवस जिवनावश्यक वस्तुचे भाव गगनाला भिडत चालले असुन या महागाईमुळे सर्वसामान्य जनतेचे हाल होत आहेत. तसेच, याचा परिणाम हॉटेल व्यावसायावर देखील होत आहे. यामुळे लाडक्या बहिणीला १ हजार ५०० रु. देण्यापेक्षा महागाईचे दर कमी करण्याची मागणी सर्वसामान्य जनतेकडून करण्यात येत आहे.

खाद्य तेल, डाळ, चणापीठ, आटा, कांदे, बटाटा, लसूण, भाजीपाला या जिवनावश्यक वस्तुंचे दर गगनाला भिडले असुन यामुळे सर्वसामान्य जनतेचे जगणे मुश्किल झाले आहे. याच वस्तुंच्या दरवढीमुळे हॉटेल व्यावसायिक देखील संकटात सापडले आहेत. कारण सर्वसामान्य जनतेचा आवडता पदार्थ वडापाव या महागाईमुळे जास्त भाव खाऊ लागला आहे.



यामुळे ग्राहकांनी वडापाव खाण्याकडे पाठ फिरवली असल्यामुळे याचा यामुळे हॉटेल व्यवसायावर परिणाम झाला आहे. शासनसेवेत काम करणाऱ्या नोकरदारांना कितीही महागाई वाढली तरी काही फरक पडत नाही. कारण त्यांच्या म हागाई भत्त्यात वाढ होत असते. यामुळे शासकीय लोकांना महागाईची झळ जाणवत नाही. परंतु, दिवसभर दहा-बारा तास काम करणाऱ्या सर्वसामान्य जनतेचे या महागाईने हाल होत आहेत.

> **"महिलांना मदतीचा हात म्हणून दर महिना १५०० रु. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. याचा फायदा खेडेगावातील काही महिलांना तांत्रीक कारणांमुळे झालेला नाही. याउलट लाखो रुपये पगार घेणाऱ्या व्यक्तीच्या पत्नीला मात्र त्वरित लाडक्या बहिणीचे पैसे जमा झाले आहेत. तर, काही दिवसांपूर्वी एकाच माणसाने लाडक्या बहिणीचे ३० अर्ज भरून त्यातले २६ अर्ज मंजूर होऊन त्या माणसाच्या नावावर ३००० प्रमाणे ७८हजार रु. जमा झाले आहेत. याला जबाबदार कोण? ही लाडकी बहीण योजना नक्की कुणासाठी? यापेक्षा महागाई दर नियंत्रणात ठेवणे गरजेचे आहे.**
> **- विश्‍वास बागुल, शिवसेना ठाकरे गट, वरसगांव"**

# जिल्हा वाहतूक पोलिसांची कारवाई

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

वाहतूकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांना पोलिसांनी शुक्रवारी कारवाई करत दणका दिला. त्यांच्याकडून १ लाख ९९ हजार ७०० रुपयांचा दंड वसुल करण्यात आला. रायगड जिल्हा वाहतूक शाखेच्या मार्फत जिल्ह्यातील राष्ट्रीय, राज्य व जिल्हा तसेच तालुका मार्गावर पोलिस तैनात करण्यात आले. शुक्रवारी नाका-नाक्यावर वाहतूक पोलिसांनी उभ्या राहून बेशिस्त चालकांना शिस्त लावण्याचा प्रयत्न केला. हेल्मेट नसणे, वाहन वेगात चालविणे, जादा प्रवासी वाहतूक करणे अशा अनेक वाहतूकीचे नियम मोडणाऱ्या २०३ चालकांविरोधात कारवाई करण्यात आली. वाहतूक पोलिसांच्या या कारवाईने बेशिस्त चालकांना दणका देण्यात आला.




कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयआेनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)